

ना बाण, ना खानः संभाजीनगरात फडणवीसांची नवी घोषणा

(पान ५ वर)

दैनिक
# दिव्य वतन
जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



वैभव सूर्यवंशीचा ऐतिहासिक पराक्रम

(पान ७ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com शुक्रवार दिनांक ९ जानेवारी २०२६ अंक : १५६ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

# महाराष्ट्राचा आता बिहार व्हायला लागलाय!

## प्रकाश आंबेडकरांचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात, दोन्ही पवारांवरही डागली तोफ

दिव्य वतन /वृत्तसेवा

सोलापूरः "महाराष्ट्रातील राजकारणातून आता तत्व आणि विचार पूर्णपणे संपले असून केवळ सत्ता आणि टेंडरसाठी अभद्र युती केल्या जात आहेत. राजकारणात आता खुनांपर्यंत मजल गेली असून महाराष्ट्राचे आता 'बिहार' व्हायला लागले आहे," असा खळबळजनक आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

दोन्ही पवारांनी भाजपला 'उल्लू' बनवले!

यावेळी बोलताना प्रकाश आंबेडकरांनी राष्ट्रवादीतील फुटीवर खोचक टिप्पणी केली. "शरद पवार आणि अजित पवार हे दोघेही वेगळे नसून ते एकत्रच आहेत. त्यांनी मिळून भाजपला 'उल्लू' बनवले आहे. केवळ स्वतःच्या चौकशा थांबवण्यासाठी त्यांनी हे सर्व केले असून, भाजपने आतापर्यंत त्यांच्या केसेस दाबून का ठेवल्या, याचे उत्तर द्यावे," असे आव्हान आंबेडकरांनी दिले.

सुशीलकुमार शिंदेंवरही निशाणा

सोलापुरातील 'बिनविरोध' निवडणुकीच्या परंपरेवर



बोलताना आंबेडकरांनी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनाही लक्ष्य केले. "शिंदे यांनीही यापूर्वी स्वतःला बिनविरोध निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले होते. मात्र, तेव्हा चळवळीतील उमेदवार मल्लपा शिंदे ठाम राहिल्याने त्यांचा प्रयत्न फसला होता," अशी आठवण त्यांनी करून दिली.

### टेंडरसाठी राजकारण; महाराष्ट्रात 'बिहार' पॅटर्न?

**राज्यातील बदलत्या राजकीय संस्कृतीवर भाष्य करताना आंबेडकर म्हणाले की, "आता पक्ष आणि विचार महत्त्वाचा राहिला नसून केवळ सत्ता आणि त्यातून मिळणारे टेंडर महत्त्वाचे झाले आहे. टेंडर मिळवण्यासाठी निवडून आले पाहिजे आणि त्यासाठी खूनही केले जात आहेत. हे चित्र महाराष्ट्राला बिहारच्या दिशेने नेणारे आहे. वंचितच्या अर्ध्या उमेदवारांना धमकावून अर्ज भरण्यापासून रोखण्यात आले," असा गंभीर आरोपही त्यांनी केला.**

### प्रणिती शिंदेंच्या रक्ताची लवकरच चाचणी!

खासदार प्रणिती शिंदे यांनी "माझ्या रक्तात काँग्रेस आहे" असे वक्तव्य केले होते. त्यावर सुजात आंबेडकरांच्या आरोपांचा संदर्भ देत प्रकाश आंबेडकर म्हणाले की, "कुणाच्या रक्तात किती भाजप आहे, हे लवकरच दिसेल. दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल."

## अजित पवारांविरोधातले बैलगाडीभर पुरावे का देत नाही ?- ठाकरे बंधूंचा फडणवीसांना सवाल

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- अजित पवारांविरोधातले घोटाळ्याचे बैगाडीभर पुरावे का देत नाही ?, असा रोकडा सवाल राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केलाय. तसेच फडणीसांनी भ्रष्टाचाराविरोधात बोलूच नये, असा टोलाही त्यांनी हाणला. ड्रग्ज आणि राजकारणातल्या पैशाचा संबंध तपासावे, असे आव्हानही ठाकरे बंधूनी राज्य सरकारला दिले.



महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे दोन दशकांनंतर एकत्र आलेत. त्यांनी एकाच मंचावरून 'सामना'साठी दिलेल्या संयुक्त मुलाखतीमुळे संपूर्ण राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मराठी अस्मिता, मुंबईचे भवितव्य आणि महाराष्ट्राच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा दावा करत ठाकरे बंधूंनी एकत्र येत "अभी नहीं तो कभी नहीं" अशी थेट गर्जना केली. ही केवळ भावनिक एकत्र येण्याची घटना नसून मराठी माणसाच्या भविष्यासाठीची निर्णायक लढाई असल्याचे दोघांनीही स्पष्ट केले.या मुलाखतीच्या सुरुवातीलाच ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यामागील कारणांवर चर्चा झाली.

## जनगणना 2027- पहिला टप्पा 1 एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान होईल सरकार घरांची यादी आणि माहिती गोळा करेल, अधिसूचना जारी

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- केंद्रीय गृह मंत्रालयाने (MHA) सांगितले की, देशात होणाऱ्या 2027 च्या जनगणनेचा पहिला टप्पा 1 एप्रिल ते 30 सप्टेंबर दरम्यान पार पडेल. याची सुरुवात घरांची यादी तयार करणे आणि घरांचा डेटा गोळा करण्यापासून होईल. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेश त्यांच्या येथे 30 दिवसांत हे काम पूर्ण करतील.

MHA ने बुधवारी अधिसूचना जारी करून सांगितले की, 1 एप्रिलपासून देशभरातील सर्व घरे आणि कुटुंबांची यादी तयार केली जाईल. तसेच, कुटुंबांची इतर माहिती देखील गोळा केली जाईल, जेणेकरून लोकसंख्या मोजण्याची मजबूत तयारी करता येईल.

सरकारने असेही म्हटले आहे की, घरांची यादी तयार करण्यास सुरुवात होण्यापूर्वी 15 दिवस लोकांना स्वतः माहिती भरण्याचा (सेल्फ एन्यूमरेशन) पर्याय देखील दिला जाईल. वास्तविक पाहता, जनगणना




2021 मध्ये होणार होती, परंतु कोरोना महामारीमुळे ती पुढे ढकलण्यात आली होती, जी आता 2027 मध्ये पूर्ण होईल.

सरकारने सांगितले की, यावेळी जनगणना पूर्णपणे डिजिटल असेल. सुमारे 30 लाख कर्मचारी मोबाइल ॲपद्वारे माहिती गोळा करतील. मोबाइल ॲप, पोर्टल आणि रिअल टाइम डेटा ट्रान्सफरमुळे जनगणना मोठ्या प्रमाणात पेपरलेस होईल.

हे ॲप Android आणि iOS दोन्हीवर काम करतील. जातीशी संबंधित डेटा देखील डिजिटल पद्धतीने गोळा केला जाईल. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच जनगणनेत जातींची गणना समाविष्ट केली जाईल. यापूर्वी, इंग्रजांच्या काळात 1931 पर्यंत जाती-आधारित जनगणना झाली होती.

# 15 तारीख याद राखा, बॅगा भरुन ठेवा

## 17 तारखेची सकाळ मुंबईत पाहू शकणार नाहीत, नीतेश राणेंचा बांगलादेशी रोहिंग्यांना इशारा

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- भाजप आमदार नितेश राणे यांनी कांदिवली येथील जाहीर सभेत बोलताना अत्यंत आक्रमक पवित्रा घेत बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्या मुस्लिमांना मुंबई सोडण्याचा थेट इशारा दिला आहे. "मी सर्व मुस्लिमांच्या विरोधात नाही, राष्ट्रवादी विचारांचे मुस्लिम आमच्यासोबत आहेत. पण ज्यांना ठोकायचं आहे, ते मला चांगलं माहिती आहे. १५ तारीख याद राखा आणि आपल्या बॅगा भरून ठेवा. १६ तारखेनंतर एकही बांगलादेशी किंवा रोहिंग्या मुंबईत दिसणार नाही,"




असे नीतेश राणे म्हणालेत. त्यांच्या या भाषणामुळे मुंबईतील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी आयोजित या सभेत नितेश राणे यांनी घुसखोरांना मुंबईबाहेर काढण्याचा निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले, "१६ जानेवारीला आम्ही विजयाचा जल्लोष करू आणि मुंबईत 'I Love Mahadev' म्हणणारा महापौर बसवू. त्यानंतर १७ तारखेला या जिहाद्यांसाठी डेडलाईन असेल. १७ तारखेची सकाळ ते मुंबईत पाहू शकणार नाहीत." मालवणीत जे 'हिरवे साप' वळवळत आहेत, ते लवकरच कमी होतील, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना नितेश राणे यांनी उत्तर भारतीयांना साद घातली. "ठाकरे म्हणतात की सर्वांना मराठी आलीच पाहिजे. मी उत्तर भारतीय बांधवांना सांगेन की, जेव्हा ते तुमच्याकडे येतील तेव्हा त्यांना सांगा की आम्ही मराठी बोलतो, पण तुम्ही आधी बेहराम पाड्यात जाऊन तिथल्या लोकांना मराठी शिकवा," असा टोला त्यांनी लगावला.

## अजित पवारांच्या सभेपूर्वीच पोलिसांचा मोठा दणका

### NCP उमेदवारासह 8 जण सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातून हद्दपार

दिव्य वतन /वृत्तसेवा

सांगली महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत पोलिस दलाने गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी कडक पावले उचलली असून, यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाला मोठा झटका बसला आहे. प्रभाग क्रमांक ६ मधील राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार आझम काझी यांच्यासह त्यांच्या टोळीतील एकूण आठ जणांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, उद्या ९ जानेवारी रोजी मिरजेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जाहीर सभा होणार असतानाच ही कारवाई झाल्याने राजकीय गोटात मोठी खळबळ उडाली आहे.



पोलिस अधीक्षक संदीप घुगे यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ही धडक कारवाई केली आहे. टोळीप्रमुख शोएब ऊर्फ मोहमद युसूफ साहेबपीर चमनमलीक काझी, मतीन काझी, अक्रम काझी, रमेश कुंजीरे, अस्लम काझी, उमेदवार आझम काझी, अल्ताफ रोहीले आणि मोहसिन गोदड या आठ जणांना सांगली आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यांतून एक वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांच्या मुद्द्यावरून भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये एकमेकांवर जोरदार टीकास्त्र डागले जात होते,

# आरोप सिद्ध झाले तर राजकारणातून संन्यास घेईन!

## नीलेश घायवाळ प्रकरणावरून मुरलीधर मोहोळांचे विरोधकांना खुले आव्हान

दिव्य वतन /वृत्तसेवा

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय आरोप-प्रत्यारोपांनी टोक गाठले आहे. कुख्यात गुंड नीलेश घायवाळ प्रकरणातील गुन्हेगारांना परदेशात पळून जाण्यासाठी मदत केल्याचा गंभीर आरोप भाजप नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर करण्यात आला होता. अजित पवारांनी देखील मोहोळ यांच्यावर या संदर्भात टीका करत आरोप केला होता. या आरोपांमुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, आता स्वतः मुरलीधर मोहोळ यांनी यावर आक्रमक पवित्रा घेतला आहे. माझ्यावर झालेले आरोप सिद्ध करून दाखवा, जर ते सिद्ध झाले तर मी आजच राजकारणातून संन्यास घेईन, असे थेट आव्हान मोहोळ यांनी दिले आहे.

पुण्यातील गुन्हेगारी आणि टोळीयुद्ध हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. नीलेश घायवाळ या कुख्यात गुंडाशी संबंधित काही गुन्हेगारांवर पोलिसांची कारवाई सुरू असताना, त्यांना देशाबाहेर पळून जाण्यासाठी मुरलीधर मोहोळ यांनी रसद पुरवली आणि राजकीय दबावाचा वापर करून मदत केली, असा खळबळजनक आरोप विरोधकांकडून करण्यात आला होता. गुन्हेगारांना कायदेशीर कचाट्यातून वाचवण्यासाठी मोहोळ यांनी आपले वजन वापरले आणि त्यांना विदेशात सुरक्षित स्थळी धाडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, असे या आरोपांचे स्वरूप आहे. निवडणुकीच्या काळात हा मुद्दा समोर आल्याने मोहोळ यांच्या प्रतिमेला धक्का लावण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जात आहे.

या आरोपांना प्रत्युत्तर देताना मुरलीधर मोहोळ म्हणाले की, निवडणूक जवळ आली की अशा प्रकारचे बिनबुडाचे आणि खालच्या पातळीवरचे आरोप करणे ही विरोधकांची पद्धत झाली आहे. मी कोणत्याही गुन्हेगाराला कधीही मदत केलेली नाही. ज्यांनी माझ्यावर हे आरोप केले आहेत, त्यांना मी जाहीर आव्हान देतो की त्यांनी पुरावे समोर आणावेत. जर हे आरोप खरे ठरले तर मी राजकारणातून कायमची एक्झिट घेईन. मात्र, जर आरोप खोटे ठरले तर ज्यांनी हे आरोप केले आहेत, त्यांनी राजकारणातून संन्यास घेण्याची हिंमत दाखववावी, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

मुद्द्याचे राजकारण करण्याऐवजी विरोधक वैयक्तिक चिखलफेक करत असल्याचे सांगत मोहोळ यांनी चर्चेचे निमंत्रण दिले आहे. या प्रकरणावर चर्चा करण्यासाठी मी कोणत्याही व्यासपीठावर यायला तयार आहे. विरोधकांनी



समोरासमोर येऊन बोलावे आणि पुराव्यानिशी चर्चा करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. या आव्हानामुळे आता विरोधक यावर काय भूमिका घेतात, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे. गुन्हेगारीच्या मुद्द्यावरून पुण्याचे राजकारण आता अधिकच तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## महत्त्वाचे...

### तुळजापुरात अनैतिक संबंधातून खून




तुळजापूर - तालुक्यातील तामलवाडी पोलिसस्टेशनच्या हद्दीत दीर-भावजयीच्या अनैतिकसंबंधांची माहिती वडिलांपर्यंत पोहोचवतअसल्याचा राग मनात धरून, एका निर्दयीचुलत्याने आपल्या १३ वर्षीय पुतण्याचादिवसाढवळ्या खून केला. ही संतापजनकघटना तामलवाडी साठवण तलावाजवळसोमवारी (५ जानेवारी) उघडकीस आलीआहे. ओमकार कांबळे असे आरोपीचे तरकृष्णा कांबळे (१३) असे मृताचे नाव आहे.सहायक पोलिस निरीक्षक गोकूळ ठाकूरयांच्या नेतृत्वाखाली तामलवाडी पोलिसांनीअवघ्या २४ तासांत खुनाचा छडा लावतआरोपीला बेड्या ठोकल्या. आरोपीलासोमवारपर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडीसुनावली. सोलापूर-धुळे राष्ट्रीयमहामार्गालगत तामलवाडी शिवारात कदमयांची शेती आहे. ही शेती दत्ता कोरे हे बटईनेकरीत होते. उमरगा तालुक्यातील कोळसूरगावचा ओमकार देविदास कांबळे हाआपल्या भावजयीसोबत सालगडी म्हणून काम करत होता. महिलेचा १३ वर्षीय मुलगा कृष्णा उर्फसदानंद कांबळे हा कधी वडिलांकडेतर कधी आईकडे राहत होता. कृष्णाहा आई व काका यांच्यातील अनैतिकसंबंधांची माहिती आपल्या वडिलांनादेत असे. त्यामुळे तोदीर-भावजयीच्या प्रेमसंबंधातअडसर ठरत होता. याच रागातून १जानेवारी रोजी दुपारी १२ वाजण्याच्यासुमारास, आरोपी ओमकार कांबळेयाने तलावातील पाणी उपसाकरणाऱ्या विद्युत पंपाचा पाइपबसवण्याच्या बहाण्याने कृष्णालातामलवाडी साठवण तलावाजवळनेले. तिथे कुऱ्हाडीचे वार करूनकृष्णाचा खून केला आणि मृतदेहतलावाशेजारील गवतामध्ये फेकूनआरोपी पसार झाला. नंतर त्यालापोलिसांनी ताब्यात घेतले. पुढीलतपास सहायक पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकूर करत आहेत.

### खामगावसह निधोन्यात दोन शेतकरी आत्महत्या



खामगाव- कर्जबाजारीपणाच्या विवंचनेमुळे दोन शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या घटनांत जीवन संपवल्याच्या घटना फुलंब्री तालुक्यात घडल्या आहेत. बंडू देवराव म्हस्के (३६, रा. खामगाव गोरक्ष) व संतोष हैबतराव काटकर (४२, रा. निधोना) अशी मृतांची नावे आहेत. खामगाव गोरक्ष येथील बंडू म्हस्के यांनी स्वत:च्या शेतामध्ये गट नं. ३८४ मधील सैलानी दर्गा परिसरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली, तर तीन दिवसांपूर्वी संतोष काटकर यांनी निधोना शिवारातील गट क्रमांक १०६ मध्ये लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. यामध्ये बंडू म्हस्के हे मोलमजुरीने काम करून आपल्या अल्प जमिनीमध्ये उपजीविका भागवत होते. त्यांच्याकडे खासगी बचत गटाचे कर्ज होते, अशी माहिती नातेवाइकांनी दिली.

१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...

### उमरखेड पालिकेच्या उपाध्यक्षांसह 3 स्वीकृत सदस्य 16 ला ठरणार



नगर पालिकेमध्ये जनशक्ती पॅनलचा विजय झाल्यानंतर नगराध्यक्षासहित १७ नगरसेवक निवडून आल्याने एक हाती सत्ता जनशक्ती पॅनलला प्राप्त झाली आहे. अशातच आता शुक्रवारी १६ जानेवारीला होणाऱ्या उपाध्यक्ष पद व स्वीकृत सदस्यांच्या निवडीला घेऊन सत्ताधारी जनशक्ती पॅनलमध्ये रस्सीखेच होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.जनशक्ती पॅनल हे कॉंग्रेस, शिवसेना (उबाठा) व जनशक्ती पॅनल या तिघांनी मिळून उभे केले होते. जनशक्ती पॅनलच्या तेजश्री जैन या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयी झाल्या त्यामुळे आता उपाध्यक्षासह विविध सभापती पद हे कॉंग्रेस व 'उबाठा'कडे जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अशातच शहरात आतापर्यंत पॅनलवर झालेल्या निवडणुकीत नगर अध्यक्ष निवड झाल्यानंतर उपाध्यक्षपदी हा मुस्लिम चेहरा बसवण्यात येत होता. यावेळेस ही परंपरा कायम राहील अथवा राहणार नाही हे मात्र आत्ताच सांगणे कठीण आहे . जर परंपरेनुसार उपाध्यक्षपद हे मुस्लिम समाजाला देण्याचे ठरल्यास कॉंग्रेसकडे उपाध्यक्ष पद जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### 'एआय'चा वापर किती करायचा हे पत्रकारांनी ठरवावे

'एआयमुळे पत्रकारीता सोपी झाली. मात्र ही कृत्रिम बुद्धिमत्ता पुढील काळात पत्रकारितेपुढे मोठे आव्हान वाढवणारे आहे. त्यामुळे काम सोपे होईल पण विचार क्षमता खुंटेल. यामुळे एआयचा किती वापर करयाचा हे आपल्याला ठरवावे लागेल,' असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार नितीन पखाले यांनी केले. श्रमीक पत्रकार संघाद्वारे आयोजित पत्रकार दिनाच्या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते. शहरातील केमिस्ट भवनात राज्य श्रमिक पत्रकार संघाशी संलग्नित शाखेने पत्रकारदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी अध्यक्षस्थानी पत्रकार आरती गंधे होत्या.

मुख्य अतिथी म्हणून तहसीलदार डॉ. योगेश देशमुख, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतिश चवरे, पत्रकार भास्कर मेहरे, श्रमिक संघाचे अध्यक्ष श्रीकांत राऊत, सचिव अमोल ढोणे उपस्थित होते.

# नायलॉन मांजा वापरणाऱ्या मुलांच्या पालकांना 50 हजार रुपयांचा दंड !

## कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांसह सर्वांवरच होणार कारवाई

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर- : नायलॉन मांजामुळे पक्षांसह अनेक ठिकाणी माणसेही अपघातग्रस्त झालेले आहेत. कित्येकांना आपला जीव गमवावा लागला आहे. याबाबत उच्च न्यायालयाने विविध प्रकरणांच्या सुनवाई दरम्यान वेळोवेळी आदेश देऊनही जर याला अटकाव होत नसेल तर मांजा वापरणाऱ्या मुलांच्या पालकांसह विक्रेते व संबंधितांवर दंडाच्या रोख रकमेसह कठोर कारवाई का होऊ नये असा उद्विग्न सवाल मा. उच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. याबाबत संबंधितांनी आपले काही म्हणणे असेल तर येत्या 5 जानेवारी रोजी होणाऱ्या सुनावणीत मा. न्यायालयासमोर मांडावेत, असे निर्देश दिले आहेत.

मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे नायलॉन मांजाबाबत दाखल असलेल्या याचिकेच्या सुनावणीमध्ये विविध प्रश्न उपस्थित करण्यात आले. यासंदर्भात मांजा विक्रेत्यांना जबाबदार ठरविले पाहिजे, असे न्यायालयाचे मत झाले आहे.

याचबरोबर जर एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास, त्यांच्या पालकांना मा. न्यायालयात ५०,०००/- रुपये दंड स्वरुपात जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत असा उद्विग्न सवाल न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांनी उपस्थित केला.

त्यांच्या खंडपीठापुढे या याचिकेवर सुनावणी सुरु आहे.

एखादी प्रौढ व्यक्ती नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळली, तर त्या प्रौढ व्यक्तीला ५०,०००/- रुपये दंड व विक्रीच्या उद्देशाने अशा नायलॉन मांजाचा साठा ज्या विक्रेत्याकडे आढळेल त्याला प्रत्येक उल्लंघनासाठी २ लाख ५० हजार रुपये दंड स्वरुपात जमा करण्याचा आदेश का देऊ नयेत, असे प्रश्न न्यायालयाने सुनावणी दरम्यान उपस्थित केले. येत्या 5 जानेवारी रोजी पुढील सुनावणी याबाबत निश्चित केलेली असून ज्यांना उपरोक्त प्रस्तावित कारवाईविरुद्ध निवेदन करावयाचे आहे त्यांनी न्यायालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावेत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. या सुनावणी दरम्यान कोणीही उपस्थित राहून आपले म्हणणे सादर न केल्यास या प्रस्तावावर कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरले जाईल. या



संदर्भात सर्व जिल्हाधिकारी यांनी जनतेत व्यापक जागृती व्हावी यासाठी योग्य ते सर्व प्रसिद्धी करण्याचे आदेशही न्यायालयाने बजावले आहे.

## ढालगाव खैरी प्राथमिक आरोग्य केंद्र खापा तालुका सावनेर येथे पाण्याच्या टाकीजवळील पाईपलाईन लिकेज बाबत

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

मौजा ढालगाव खैरी येथे दिनांक 3.1.2025 रोजी ग्रामपंचायत जवळील पाण्याच्या टाकी जवळ ची पाईपलाईन लिकेज असल्याचे दिसून आल्यामुळे ग्रामपंचायत मार्फत दिनांक 4.1.2025 रविवार रोजी दुरुस्ती करण्यात आली. तसेच दिनांक 4.1.25 ला श्री राजेश मोवाडे यांच्या घराजवळील नळ योजना पाईपलाईन वरून इलेक्ट्रिक पोलचा ट्रॅक्टर गेल्यामुळे पाईपलाईन फुटली. नादुरुस्त पाईपलाईन मधून पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा झाल्यामुळे जलजन्य आजार सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती मिळताच दिनांक 4.1.25 ला प्राथमिक आरोग्य केंद्र केंद्र खापा येथील आरोग्य पथकाने ग्रामपंचायतला भेट देऊन पाण्याचे शास्त्रीय पद्धतीने सुपर क्लोरीनेशन करून पाणीपुरवठा करण्याच्या सूचना दिल्या. प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून पाण्याचे नमुने, ब्लीचिंग नमुने, ओटी टेस्ट घेण्यात आले.तसेच पाणी नमुने व ब्लिचिंग नमुने प्रयोग शाळेत पाठवण्यात आले . मोजा डालगाव येथे एकूण 376 घर व एक 1692 लोकसंख्या आहे. या गावात आरोग्य विभागाने दिनांक 4.1.2025 ते 7.1.2025 या कालावधीत सलग प्रत्यक्ष साथरोग सर्वेक्षण केले. सर्वेक्षणात प्रगती पर 10 रुग्ण आढळून आले. या रुग्णांवर घरीच औषध उपचार करण्यात आले. सर्वच रुग्ण सौम्य आजाराचे आढळले. एकही गंभीर स्वरूपाचा रोग आढळून आला नाही, व कोणालाही भरती करण्याची आवश्यकता भासली नाही. दिनांक 7.1.2025 रोजी एकही नवीन रुग्ण आढळला नाही.

## भोयर, पवार समाजाकरीता खासदार काळे लढणार

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : केंद्रीय ओबीसी सूचीमध्ये समावेश करणे याबाबत महाराष्ट्रातील भोयर, पवार सह इतर 27 जातीचे प्रलंबित प्रकरण निकाली लागावे यासाठी लोकसभा अधिवेशनात मागील 26 मार्च 2025 रोजी खासदार अमर काळे यांनी शून्य तासात मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर सामाजिक न्याय मंत्रालयाकडून पुढील कारवाई विषयी पत्र 25 एप्रिल 2025 ला प्राप्त झाले होते. 8 महीन्याचा कालावधी लोटूनही मंत्रालय कडून काय कारवाही झाली बाबत पुन्हा याविषयी दिनांक



17 डिसेंबर 2025 ला महाराष्ट्र ओबीसी कृती समिती व पवार मिशन टीम यांनी दिल्ली येथे वर्धा लोकसभा क्षेत्राचे खासदार अमर काळे यांना निवेदन दिले. या निवेदनाची त्वरित दखल घेऊन खासदार महोदयांनी केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्री वीरेंद्रकुमार खाटिक यांचे लोकसभा सदन येथे भेट घेऊन प्रकरण लवकर निकाली निघावे बाबत प्रदीर्घ चर्चा केली. सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्री यांनी दिनाक 30 डिसेंबर 2025 ला भारतीय संविधान कलम अ, क 342 अंतर्गत या प्रकरणावर कारवाई सुरू असल्याचे पत्र खासदार अमर काळे यांना दिले आहे. या अधिवेशन दरम्यान या विषयावर पुन्हा शून्य तासात लोकसभा सदन मध्ये मुद्दा उपस्थित करणे बाबत खासदार काळेंनी वेळ मागितली होती. परंतु त्यांना बोलण्याची संधी दिली नाही.

या विषयावर लक्ष केंद्रित करणे बाबत केंद्रीय गृहमंत्री व प्रधानमंत्री यांचेशी चर्चेकरिता खासदार अमर काळे प्रयत्नशील आहे. अशी माहिती अखिल भारतीय भोयर पवार महासंघाचे सचिव मोरेश्वर भादे यांनी दिली.

## पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नरखेड–काटोल येथे आढावा बैठक

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

काटोल - जलजीवन मिशनअंतर्गत प्रलंबित कामांना गती देण्याचे आमदार चरणसिंग ठाकूर यांचे निर्देश तालुक्यासह नरखेड व काटोल तालुक्यातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती नरखेड व काटोल येथे आज महत्त्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत जलजीवन मिशनअंतर्गत सर्व ग्रामपंचायतींमधील प्रलंबित पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी ज्या-ज्या गावांमध्ये नवीन पाणीपुरवठा योजना, टाक्या, नाले, विहिरी मंजूर करणे आवश्यक आहे,

अशा सर्व प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करण्याचे स्पष्ट निर्देश आमदार चरणसिंग ठाकूर यांनी सर्व ग्रामसेवक व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी कोणतीही अडचण भासू नये, यासाठी प्रशासनाने समन्वयाने व तत्परतेने काम करावे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

बैठकीदरम्यान जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या व रखडलेल्या कामांची सद्यस्थिती, तांत्रिक अडचणी, निधीविषयक बाबी तसेच भविष्यातील उपाययोजना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पाणीपुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी वेळापत्रक निश्चित करून कामांना गती देण्यावर भर देण्यात आला.

या आढावा बैठकीस उपविभागीय अधिकारी पियुष चिवंडे, नरखेड तहसीलदार खोडगे, काटोल तहसीलदार श्रीमती आभा बोरकर, काटोल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री सूर्यवंशी, नरखेड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अक्षय भगत यांच्यासह सतीश रेवतकर, उकेश चव्हाण, चंद्रशेखर चिखले, प्रवीण लोहे, संदीप सरोदे, दिलेश ठाकरे, दिनेश चापले, चंद्रशेखर काळबांडे, सारंग दळवी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीमुळे जलजीवन मिशनअंतर्गत रखडलेल्या कामांना गती मिळून ग्रामीण भागातील नागरिकांना कायमस्वरूपी व सुरक्षित पाणीपुरवठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलली जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या अभ्यागत कक्ष व नुतन प्रवेशद्वाराचे उद्घाटन

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, नागपूर खंडपीठ येथील अभ्यागत कक्ष व नुतन प्रवेशद्वार सुविधेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयचे न्यायमूर्ती अनिल ए. किलोर व न्यायमूर्ती राज डी. वाकोडे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी न्यायाधिकरणाचे उपाध्यक्ष विनय जोशी व सदस्य (प्रशासकीय) नितीन गद्रे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी न्यायमूर्ती अनिल एस. किलोर व न्यायमूर्ती राज डी.वाकोडे यांनी



न्यायाधिकरणाच्या कार्यालयाची पाहणी केली. या ठिकाणी अशिलांच्या सुविधेसाठी त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला विविध सूचना केल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता जनार्दन भानूसे, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत राऊळकर यांना त्यांनी विविध सुविधेबाबत निर्देश दिले. यावेळी न्यायाधिकरणातील वकील संघाचे अध्यक्ष एन.डी. ठोंबरे, मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथील वकील संघटनेचे अध्यक्ष अभय सांबरे व उपाध्यक्ष जी.एन. खानझोडे, न्यायाधिकरणाचे मुख्य सादरकर्ता अधिकारी श्रीकांत देव आदी मान्यवर उपस्थित होते. मा न्यायमूर्ती यांनी नूतनीकरणाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले.

# नगराध्यक्षा संजना मंगळे यांनी स्वीकारला पदभार

## ठाम निर्धार आश्वासनांची पूर्तता करणार

**दिव्य वतन /अनिल अडकिने**

सावनेर -भारतीय जनता पक्षाचे आमदार आशिष देशमुख, जिल्हा अध्यक्ष मनोहर कुंभारे सोबतच भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संजना मंदार मंगळे यांच्या नेतृत्वावर वर सावनेर करांनी पुर्ण विश्वास टाकत अध्यक्ष पदासह २१ नगरसेवक निवडून देत एकहाती सावनेर नगरपालिकेची सत्ता सोपवली आहे. २१ डिसेंबर ला निकाल लागल्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष, नगरसेवकासह समस्त नगरवासीयांचे लक्ष पदग्रहण समारंभाकडे वेधले होती. ती उत्सुकता दि.६ जानेवारी २०२६ रोजी गणेश चतुर्थीच्या पावन प्रसंगी क्षेत्राचे आमदाथ आशिष देशमुख, राज्यस्तरीय सदस्य डॉ. राजीव पोतदार, नागपुर जिल्हा अध्यक्ष मनोहर कुंभारे ,भाजपाचे वरिष्ठ नेते दादाराव मंगळे, डॉ. विजय धोटे, प्रकाश टेकाडे, रामराव मोवाडे, माजी नगरसेवक तुषार उमाटे, सावनेर नगरपालिकेच्या मुख्याधिकारी आर्शीया जुही यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो कार्यकर्ते,शहरातील गणमान्याच्या साक्षीने सौ.संजना मंदार मंगळे यांनी आज अध्यक्ष पदाचा कार्यभाळ सांभाळला. सावनेर नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर सौ.संजना मंगळे यांनी आज अत्यंत उत्साही वातावरणात आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली. नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीमध्ये मोठ्या जनसमुदायाच्या साक्षीने त्यांनी पदभार ग्रहण केला. यावेळी "जनतेच्या आशीर्वादाने मी या खुर्चीवर बसली असून सावनेर नगरीला सुरक्षित, सुशिक्षित,सुसंस्कृत आणि स्वच्छ शहर बनवणे हेच माझे ध्येय आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले. पदभार स्वीकारल्यानंतर सौ संजना मंगळे यांनी पत्रकारांसोबत वार्तालाप केला त्यावेळी त्यांनी सांगितले की,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राजस्व तसेच नागपुर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, क्षेत्राचे आमदार आशिषबाबू देशमुख, जिल्ह्याचे तडफदार जिल्हाध्यक्ष मनोहरभाऊ कुंभारे, वरिष्ठ नेते रामराव मोवाडे आदिंनी मिळून सावनेर नगरीला विकासाच्या मार्गवर नेणारा आम्ही जो जाहीरनामा प्रसिद्ध केला होता त्या जाहीरनामाला समोर ठेवूनच विकास कामाला सुरुवात करणार आसुन पुढील पाच वर्षात नगरीचा कायापलट करूण नक्कीच दाखवू असा ठाम विश्वास व्यक्त करत म्हटले की आम्ही प्रयत्नशील आहोत आणि हे करण्यासाठी मला सर्व नगरसेवकांचे पाठबळ देखील मिळेल असा विश्वास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पाच वर्षे कामकाज करणे सोयीचे जावे याकरिता सावनेरकरांनी आपले बहुमोल मताने आमाचा विजय निश्चित करत अध्यक्ष पदासह २१ नगरसेवक म्हणजेच २२ लोकांना नगरीची सत्ता सोपवली असल्याने सर्वजण मिळून काम करणार व मिळिलेल्या संधीचे सोनं करुण दाखवू असा निर्धार याप्रसंगी व्यक्त केला. याप्रसंगी आपले विचार व्यक्त करत भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष मनोहर कुंभारे यांनी म्हटले की सावनेरकरांनी आमच्या शब्दाला मान देत आमच्यावर जो विश्वास टाकला त्यास कधीही तडा पडू देणार नाही. आम्ही विकासाच्या नावावर मते मागितलि आहे.तर विकास काय व कसा असतो तो आमदार आशिषबाबू देशमुख, राज्याचे राजस्व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पौराणिक व सांस्कृतिक महत्वप्राप्त सावनेर नगरीला गतवैभव मिळवून देण्यासाठी टोकाचे प्रयत्न करु असे मत व्यक्त केले. फडकवून टाकला झेंडा क्षेत्राचे आमदार डॉ. आशिषबाबू देशमुख यांनी आपल्या चिरशैलीत संबोधित कर म्हटले की "फडकवून टाकू झेंडा" विकासाच्या नावावर,प्रगतीच्या नावावर, मागील तीसवर्षापासून लागलेली अवदसा मिटवीण्याच्या नावावर सावनेर करांनी जो विश्वास भारतीय जनता पक्षावर दाखवून एकाहाती सत्ता दिली त्याबद्दल सावनेरकर मतदात्यांचे आभार मानले व आजपासून एक नविन पर्व ,एक नवीन जवाबदारीच्या कामाला आमच्या नगराध्यक्षा संजनाताई व त्यांचे सहकारी सुरुवात करत आहो.मी आपणास आश्वस्त करतोकी सावनेर नगरीच्या विकास कार्याकरीता निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही याप्रसंगी बोलतांना दिली. भारतीय. जनता पार्टीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा संजना मंदिर मंगळे समेत नगरसेवक नीलेश पटे, वनिता घुगल, राजेश गुप्ता, सौ.रिमा बालाखे , योगिता घोरमारे, आशीष मानकर, सोनाली उमाटे, शालिक मोहतुरे , अरविंद ताजने, नलिनी नारेकर , कोकिला जाधव , चित्रा वाठ, दुर्गेश पारवे ,अपर्णा उज्ज्वल बागड़े, रवींद्र ठाकुर, मनीषा लोधी, सुचिता बापूराव सूरे, महेश चकोले, अश्विनी वसंत सैयाम, राजू घुगल, राजुभाऊ भुजाडे अश्या एकुण २१ नगरसेवकांनी ही आपआपले पदभार सांभाळले. आयोजनाचे संचालन संदेश खंडागळे यांनी तर आभार कले यांनी मानले.

## चिखली मार्गावरील खड्ड्याने घेतला वृद्ध महिलेचा बळी

### "आणखी किती मृत्यू झाल्यावर शासन जागं होणार?"

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

भिवापूर :- भिवापूर–चिखली या मृत्यूच्या सापळ्यात अडकलेल्या रस्त्याने अखेर आणखी एका निष्पाप जीवाचा बळी घेतला. ठिकठिकाणी पडलेल्या खोल खड्ड्यांपैकी रविवारी (दि. 4) एका मोठ्या खड्ड्यात दुचाकीचे चाक फसून झालेल्या भीषण अपघातात वृद्ध महिला गंभीर जखमी झाली होती. नागपूर येथे उपचारादरम्यान आज सकाळी तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात नागरिकांचा उद्रेक झाला आहे.गीता नानाजी काकडे (वय 60), रा. नवेगाव साधू, ता. उमरेड असे मृत महिलेचे नाव आहे. रविवारी त्या चिखली (ता. भिवापूर) येथे आपल्या मुलीच्या भेटीसाठी आल्या होत्या. परतीच्या प्रवासात भिवापूरकडे येणाऱ्या



एका दुचाकीस्वाराकडे त्यांनी लिफ्ट मागितली. मात्र हा प्रवास त्यांच्या आयुष्याचा शेवट ठरेल, याची कुणालाही कल्पना नव्हती.भिवापूर–चिखली हा अवघ्या पाच किलोमीटरचा डांबरी रस्ता पूर्णतः उखडलेला असून मोठमोठ्या खड्ड्यांनी त्याचे अक्षरशः धुळधान झाली आहे. याच रस्त्यावर एका खड्ड्यात दुचाकीचे चाक फसले आणि दुचाकी रस्त्यावर कोसळली. या अपघातात दुचाकी चालकासह मागे बसलेल्या गीताबाईंना गंभीर मार बसला. तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर गीताबाई यांना नागपूरला हलविण्यात आले; मात्र उपचार सुरू असतानाच आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.

## महत्त्वाचे...

### खेळांमुळे शिस्त, नेतृत्व, चिकाटी वाढते: सीईओ महापात्र



अमरावती-जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्र यांनी गुरुवारी अमरावती येथे शालेय क्रीडा महोत्सवाचे उद्धाटन केले. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्व, सांघिक भावना आणि चिकाटी वाढते, ज्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व घडते, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव हा विद्यार्थ्यांसाठी एक चांगला मंच असल्याचेही त्या म्हणाल्या. श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणात आजपासून तीन दिवसीय शालेय क्रीडा महोत्सवाला सुरुवात झाली. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत आयोजित या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सतीश मुगल होते. जिल्हा परिषदेचे पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब बायस आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब रायबोले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.सीईओ संजीता महापात्र यांनी यावेळी मिशन स्कॉलरशिप आणि निपुण महाराष्ट्रमध्येही यशस्वी कामगिरी करण्याचे आवाहन केले. मुलांची गुणवत्ता महाराष्ट्रात वाढवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमादरम्यान धारणी पंचायत समितीच्या जिल्हा परिषद शाळा उकुपाटी येथील विद्यार्थिनी दुर्गा छगन कास्देकर हिचा गौरव करण्यात आला. दुर्गाने लांबउडी या वैयक्तिक खेळ प्रकारात राज्यस्तरावर अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व केले होते. यावेळी तिचे मार्गदर्शक महादेव राठोडही उपस्थित होते.



### सावळापूर गाव विविध योजनांमुळे चर्चेत

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील सावळापूर गाव मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत राबवण्यात आलेल्या विविध योजनांमुळे चर्चेत आले आहे. या अभियानांतर्गत गावात लोकाभिमुख, अभिनव आणि विकासात्मक उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. यामध्ये आरोग्य, शिक्षण, पाणी आणि महिला सक्षमीकरण या प्रमुख घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या उपक्रमांमध्ये मोफत दळण केंद्र, पूर्ण कर भरणाऱ्या करदात्यांसाठी मोफत पाणी कॅन वितरण, ऑक्सिजन पार्कची निर्मिती, परसबाग उपक्रम, 'उमेद' अंतर्गत महिला उद्योग, अंगणवाडी केंद्रातील सुधारित व्यवस्था, 'अभ्यासाचा भोंगा' हा अभिनव उपक्रम, तसेच ग्रामपंचायतीच्या विविध योजना, आरोग्य केंद्र आणि जिल्हा परिषद शाळेचा समावेश आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी स्वतः उपस्थित राहून यापैकी अनेक कार्यक्रमांचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी गावकऱ्यांशी थेट संवाद साधला आणि विविध ठिकाणी भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.या कार्यक्रमादरम्यान, ग्रामपंचायत अधिकारी ऋषिकेश रहाटे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. सरपंच, उपसरपंच आणि सर्व ग्रामपंचायत सदस्यांच्या हस्ते वृक्ष देऊन सीईओ महापात्र यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. विस्तार अधिकारी (पंचायत) महादेव कासदेकर यांनी प्रास्ताविक केले.

# हिदायत पटेल यांचा उपचारादरम्यान मृत्यू

## मोहाळा येथे झाले अंत्यसंस्कार:संशयितांच्या अटकेसाठी ठिय्या आंदोलन; समर्थकांचा आक्रोश

दिव्य वतन /वृत्तसेवा

अमरावती- काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांचा अकोला येथील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान बुधवारी पहाटे मृत्यू झाला. त्यांच्या पार्थिवावर मूळ गाव मोहाळा येथे बुधवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. हिदायत पटेल यांच्यावर मंगळवारी चाकू हल्ला झाला होता. त्यांना उपचारासाठी अकोला येथे हलवण्यात आले होते. हिदायत पटेल यांच्या अंत्यसंस्कारावेळी काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, अमरावतीचे खा. बळवंत वानखडे, आ. साजित पठाण, पदवीधर मतदारसंघाचे आमदार लिंगाडे, माजी आमदार संजय गावंडे, माजी आमदार बबनराव चौधरी, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष संतोष कोरपे, ज्येष्ठ सहकार नेते नानासाहेब हिंगणकर, कृउबा समितीचे सभापती प्रशांत पाचडे यांच्यासह अनेक नेते हजर होते. उर्वरित पान ४ मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास हिदायत पटेल यांच्यावर नमाज पठनानंतर मशिदीत हल्ला झाला होता. त्यांना अकोट येथे खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यांची प्रकृती चिंताजनक होती. मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने प्रकृती आणखीनच गंभीर झाली होता. त्यामुळे त्यांना अकोला येथील खासगी रुग्णालयात हलवले होते. परंतु उपचारादरम्यान बुधवारी पहाटे त्यांचा मृत्यू झाला. ही बातमी त्यांचे मूळ गाव मोहाळा व अकोट येथे कळताच त्यांचे शेकडो समर्थक अकोट ग्रामीण ठाण्यात गोळा झाले होते. हिदायत पटेल यांचे समर्थक ग्रामीण पोलिस ठाण्यात गोळा होताच अकोटची बाजारपेठ बंद करण्यात आली होती. सोनार मार्केट स्वयंस्फूर्तीने बंद झाले होते. परंतु तणाव निवळताच बाजारपेठ पुन्हा पूर्ववत सुरू करण्यात आली.



# शहराला 5 दिवसांआड पाणी देणाऱ्यांना पाणी पाजा- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## भाषणात मित्रपक्ष भाजपचे नाव न घेता मवाळ टीकेचे धोरण

दिव्य वतन /वृत्तसेवा

अकोला : शहराला दिवसाआड नव्हे तर पाच दिवसाआड पाणी मिळते. वाढीव वस्तीतही मूलभूत सुविधांची वानवा आहे. नियमित पाणीपुरवठा न करणाऱ्यांना या निवडणुकीत पाणी पाजा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे बुधवारी केले. तेवढ्यात व्यासपीठावरील कुणीतरी शहरात भाजप सत्तेत असल्याचे लक्षात आणून देताच त्यांनी टीकेचा सूर काहीसा बदलत लगेच आपला अजेंडा विकास आहे. शहरातील रस्ते, शुद्ध पाणी, भुयारी गटार योजना, आरोग्य सेवा आदी सुविधा पुरवू. सत्ता कुणाची आहे हे मी कधीही बघत नाही, असे सांगत सारवासारव केली. विकासाच्या मुद्द्यावर बोलताना एकनाथ शिंदे यांनी भाषणात शिवसेनेचा विकासात्मक अजेंडा सांगितला. नगरविकास खाते स्वत:कडे आहे, याची आठवणही करुन दिली.भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या अकोला शहरात महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रचारसभा झाली. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ येथील जुन्या शहरात आयोजित प्रचारसभेत शिंदे यांनी मित्रपक्ष असलेल्या भाजपच्या महापालिकेतील स्थानिक नेतृत्वावर टीका करणे टाळत वाढीव हद्दीतील शहर विकासाचा आराखडा तयार करा, त्यासाठी नगरविकास विभागाकडून निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

महापालिका निवडणुकीतील शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ शिंदे यांची येथील जुन्या शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर दुपारी जाहीर सभा झाली. या सभेत त्यांनी महायुतीतील प्रमुख घटक पक्ष आणि अकोला महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भाजपचा नावानिशी कुठेही उल्लेख न करता शहर विकासासाठी महापालिकेत परिवर्तन घडवा, आगामी महापालिकेत शिवसेनेच्या जास्तीत जास्त उमेदवारांना संधी देऊन महापालिकेत भगवा



फडकवण्याचा संकल्प करा,असे आवाहनही त्यांनी केले.

शिंदे यांनी त्यांच्या वीस मिनिटांच्या भाषणात दहा मिनिटे शहर विकास आणि पाच मिनिटे उद्धव ठाकरे यांचे प्रत्यक्ष नाव न घेता शिवसेना (उबाठा) पक्षावर टीका करत लाडकी बहीण योजनेत खोडा घालणाऱ्यांना लाडक्या बहिणींनी 'जोडा' दाखवून घरी बसवले, असे सांगत काहीही झाले तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे सांगितले.

# वर्धा युथ फेस्ट 2026 चा भव्य शुभारंभ राजे छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देत उत्साहात संपन्न.

दिव्य वतन /वृत्तसेवा

वर्धा युथ फेस्टिवल समिती च्या वतीने आयोजित वर्धा युथ फेस्ट 2026 चा भव्य शुभारंभ सोहळा सोमवार, 5 जानेवारी 2026 रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक चौक, वर्धा येथे अत्यंत उत्साहात व जल्लोषात पार पडला. समस्त युवकांचे प्रेरणास्थान, असलेल्या राजे छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना व दुग्धाभिषेक करून या सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेनुसार ढोल-ताशांच्या गजरात, मानाच्या मानवंदनेसह या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या भव्य शुभारंभ सोहळ्यास वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री व गृहराज्यमंत्री मा. डॉ. पंकज भोयर तसेच माजी खासदार रामदास तडस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वर्धा शहरासह जिल्ह्यातील असंख्य युवक व नागरिक



मोठ्या संख्येने या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार बनले. यावेळी बोलताना पालकमंत्री मा. डॉ. पंकज भोयर यांनी, "वर्धा युथ फेस्टिवल हा केवळ वर्धेपुरता मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रातील युवकांचा बुलंद आवाज बनत आहे," असे गौरवोद्गार काढले. वर्धा युथ फेस्टिवल समितीचे अध्यक्ष सारंग रघाटाटे यांनी आपल्या मनोगतात, "वर्धा जिल्ह्यातील शेवटच्या युवकालाही त्याच्या हक्काचा मंच मिळवून देणे हेच आमचे ध्येय असून, हे नाविन्यपूर्ण आयोजन दरवर्षी अधिक ताकदीने आणि व्यापक स्वरूपात राबवले जाईल," असे ठाम आश्वासन दिले. हा तीन दिवसीय कार्यक्रम फेब्रुवारीच्या 11,12, व 13 ला चारखागृह येथे संपन्न होणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे विशेष नियोजन उज्वल ठाकरे, प्रतीक पवार, प्रतीक्षा पवार, तेजस ठाकरे, ओम भेदूरकर, भूषण अलोने, प्रसाद मोकद्दम, फाल्गुनी आत्राम व प्राजक्ता झोड यांच्या समन्वयातून यशस्वीरीत्या साकार झाले. युवकांचा जोश व उत्साह अधिक वाढवण्यासाठी तसेच तीन दिवसीय वर्धा युथ फेस्ट 2026 ला यशस्वी करण्यासाठी वर्धेतील जास्तीत जास्त नागरिकांनी व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वर्धा युथ फेस्टिवल समितीच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुसूत्र व प्रभावी संचालन साहिल दरणे यांनी केले.



# पीआरएसआयतर्फे डॉ. रमेश पोखरियाल 'निशंक' यांचे स्वागत

दिव्य वतन /वृत्तसेवा

वर्धा, ८ जानेवारी २०२६: माजी केंद्रीय शिक्षणमंत्री तसेच उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री डॉ. रमेश पोखरियाल 'निशंक' यांच्या वर्धा आगमनानिमित्त पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय) वर्धा चॅप्टरच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. डॉ. पोखरियाल हे वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या २९व्या स्थापना दिन समारंभाकरिता प्रमुख पाहुणे आले होते. या प्रसंगी त्यांनी बुधवार, ७ जानेवारी रोजी विद्यापीठ परिसरात आयोजित चार दिवसीय पुस्तक मेळ्याचे उद्घाटन केले. उद्घाटनानंतर विद्यापीठाच्या नागार्जुन अतिथीगृहात पीआरएसआय वर्धा चॅप्टरतर्फे त्यांचा चरखा व शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. 'निशंक' यांनी चॅप्टरच्या पदाधिकारी व सदस्यांना आशीर्वाद देत



त्यांच्या कार्याचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. डॉ. रमेश पोखरियाल 'निशंक' यांचे पीआरएसआय परिवाराशी दीर्घकालीन आणि स्नेहपूर्ण संबंध आहेत.

वर्धा चॅप्टरने आयोजित केलेल्या या स्वागत कार्यक्रमामुळे ते भारावून गेले. पीआरएसआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजीत पाठक यांच्याशीही त्यांचा जुना संबंध आहे. अलीकडेच डेहराडून येथे झालेल्या पीआरएसआयच्या राष्ट्रीय अधिवेशनात त्यांनी सहभाग घेत सर्वांना आशीर्वाद दिले होते.

या स्वागत समारंभास विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा, ज्येष्ठ पत्रकार डॉ. गोविंद सिंह, केंद्रीय हिंदी संस्थानाचे उपाध्यक्ष प्रा. सुरेंद्र दुबे, विद्यापीठाचे कुलसचिव क़ादर नवाज खान, परीक्षा नियंत्रक डॉ. सुरेंद्र गाडेवार, पीआरएसआय वर्धा चॅप्टरचे सचिव बी. एस. मिरगे, जनसंचार विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक डॉ. रेणु सिंह, हिंदी अधिकारी राजेश यादव, सहाय्यक संपादक डॉ. अमित विश्वास तसेच विद्यार्थी पंकज कलाणे, राम सिंह, देवेश कुमार दुबे, गौरव चौहान, आदित्य उत्तम, विलास चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते

# "विजया मारोतकर यांना पुण्यात सावित्रीची लेक पुरस्कार"

सुप्रसिद्ध लेखिका आणि कवयित्री विजया मारोतकर यांना मनोहर कोलते आणि मैत्री संघ, पुणे यांच्या वतीने मराठी साहित्य परिषद सभागृह, पुणे येथे सावित्रीची लेक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . सभागृहातील पुणेकरांच्या भरगच्च उपस्थितीत 89 व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस आणि महावितरणचे संचालक माननीय राजेंद्र पवार यांच्या शुभहस्ते शाल, सन्मान चिन्ह ,ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला .

श्री मनोहर कोलते आणि मित्रपरिवार यांच्यावतीने विदर्भातून देण्यात येणाऱ्या एकमेव सावित्रीची लेक या पुरस्कारा करिता विजया मारोतकर यांची त्यांच्या कार्याकरता निवड करण्यात आली .

मोबाईल फोनच्या चुकीच्या वापरामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या तरुणाईला विशेषतः मुलींना सावध करण्याच्या दृष्टीने बेटी बचाव अभियानांतर्गत विजया मारोतकर "पोरी जरा जपून "हे अभियान गेली कित्येक वर्षांपासून चालवत लाखो मुलींपर्यंत पोहोचल्या आहेत. आतापर्यंत त्यांचे संपूर्ण महाराष्ट्र आणि बाहेर 455 काव्यमय प्रबोधनाचे कार्यक्रम संपन्न झाले आहेत. ज्यामुळे कितीतरी मुली आणि घरे सावरलेली आहेत. तसेच त्या एक लेखिका असून समाजातील अनेक प्रश्नांची उकल करणारे त्यांचे साहित्य असते. कथा, कविता, कादंबरी, चरित्र लेखन, वैचारिक लेख अशा सर्व प्रकारात त्यांची पंचेचाळीस पुस्तके प्रकाशित आहेत. विविध पुरस्कारांनी सन्मानित विजया मारोतकर यांनी भारतातील पहिले अखिल भारतीय ओबीसी महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद भूषविले असून इतर सात साहित्य संमेलनाया अध्यक्ष राहिलेल्या आहेत. विजयाताईंनी आजवर साहित्य संमेलनाचे उद्घाटक,सत्र प्रमुख या भूमिकांसह निमंत्रक या नात्याने नऊ साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले आहेत ..त्यांच्या एकूणच सर्व कार्याची दखल घेत .. मनोहर कोलते मैत्री संघ, पुणे यांनी त्यांना भव्य कार्यक्रमात पुण्यात सन्मानित करत एका वैदर्भीय सावित्रीच्या कार्याची दखल घेतलेली आहे. यावेळी सेवाकार्यात गुंतलेल्या सौ तारामती इंदलकर या योद्धा पत्नी व माता यांना जिजाऊची लेक पुरस्कार देऊन गौरविले आहे. तर पुण्यातील लेखिका सौ ललिता सबनीस, लेखिका आणि आदर्श वैद्यकिय सेवा देणा-या डॉ माया तिरमारे, लांजा आणि विदिशा विचार मंच, पुणे याच्या संस्थापिका सौ ममता क्षेमकल्याणी या आपापल्या क्षेत्रात झोकून देऊन सेवेचे मोठे काम करीत असलेल्या





सावित्रीच्या लेकींना विशेष पुरस्कार देऊन सन्मानित केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ श्रीपाल सबनीस सरांनी मांडलेले विचार मोठेच लक्षवेधी ठरले. पुरस्कारार्थींच्या गौरवाप्रित्यर्थ वापरलेले शब्दमोती भारावून टाकणारे होते. विजया मारोतकर यांच्या बद्दल त्यांनी काढलेले उद्गार लक्षवेधी ठरले..

"विजया मारोतकर यांचे मनोगत संपूच नये असं वाटत होतं. त्यांचे शब्दांवरचं प्रभुत्त्व आणि वाणीतलं माधुर्य अनुभवायला मिळालं. त्यामुळे "त्यांचा एक तासाचा व्याख्यानाचा वेगळा कार्यक्रम ठेवायला हवा."

डॉ.श्रीपाल सबनीस सरांनी केलेली सूचना म्हणजे सौ विजयाताईंच्या वक्तृत्वाला श्रोत्यांच्या मनातली दिलेली सुरेख दाद होय. असे आयोजकं म्हणाले.

समाजात घडणाऱ्या चांगल्या गोष्टींचे कौतुक करतांना त्यांनी हातचे काही राखून ठेवले नाही. ...नाण्याची दुसरी बाजू म्हणजे कारभाऱ्यांच्या कारभारातील उणेपणावर, समाजातल्या तत्कालिन चालीरितीवर तसेच सद्याच्या काही वैगुण्यांवर डॉ सबनीस यांनी ओढलेले कोरडे त्यांच्यातल्या सडेतोडपणावर खरेपणाची मोहर उमटवून गेले. "

प्रमुख अतिथी माननीय राजेंद्र जी पवार यांनी पुरस्कार प्राप्त भगिनींच्या गुणांचे कौतुक करत आयोजकांना चे अभिनंदन केले .कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. पुरस्कार प्राप्त सर्व भगिनींनी आपले मनोगत व्यक्त केले .मा.मनोहर कोलते यांचा उत्साह आणि कळकळ वाखाणण्यासारखी होती. सर्व पुरस्कारार्थींचा त्यांनी सादर केलेला परिचय एक आदर्श असे उदाहरण ठरले.आभाराचे सुंदर भाषण करताना श्री भागवत थेटे यांनी आणखी दोन वर्षांनी म्हणजे आपल्या सेवाकार्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात बालगंधर्व रंगमंदिरात मोठ्या समारंभ घडवून आणून आपला उचित गौरव करण्याचे सूतावाच केले आहे.

ताज्या दमाचे श्री आकाराम आलदर, श्री पराग शिळीमकर, श्री शैलेंद्र भालेराव, श्री सचीन मोरे आणि अमर रजपूत सारखे उत्साही तरुण सहयोगी असा हा मित्रपरिवार सिद्ध आहे.

विजयाताई मारोतकर यांना प्राप्त झालेल्या या अशा भव्य पुरस्कारामुळे विदर्भाचे नाव पुण्यात कोरल्या गेलेले आहे..

विजयाताईंचे मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठानचे सचिव मंगेश बावसे, कोषाध्यक्ष अध्यक्ष डॉ. माधव शोभणे गोविंद सालपे चारुदत्त अघोर, अरुणा कडू ,नीता अल्लेवार ,राजश्री कुलकर्णी, माया मानकर, गोपाल कडूकर, संध्या राजूरकर यांचे सह अनेकांनी सावित्रीची लेक या पुरस्कारा करता अभिनंदन केले सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## लोकशाही, प्रशासन आणि जबाबदारीचा कस

देश आणि राज्यातील सध्याच्या घडामोडी पाहिल्या तर लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर असलेली जबाबदारी, प्रशासनाची कार्यपद्धती आणि जनतेच्या अपेक्षा यांचा कस लागलेला स्पष्टपणे दिसून येतो. निवडणुका पार पडल्यानंतर सत्ता स्थिर होत असताना, अनेक ठिकाणी स्वीकृत प्रतिनिधींची निवड, सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रशासकीय निर्णय याभोवती संशय, आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय खेळी रंगताना दिसत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीचा कणा मानल्या जातात. मात्र, या संस्थांमध्ये पारदर्शकता, आर्थिक शिस्त आणि जबाबदारी यांचा अभाव असल्याचे वारंवार समोर येत आहे. सहकारी संस्थांतील आर्थिक गैरव्यवहार, फेर अंकेक्षणाची मागणी, कागदपत्रांच्या सुरक्षेबाबत प्रश्न आणि प्रशासकीय विलंब हे प्रकार केवळ एखाद्या एका संस्थेपुरते मर्यादित नसून, ही एक व्यापक समस्या बनली आहे. राजकारणात सत्तासंघर्ष नवीन नाही. मात्र, सत्ता मिळाल्यानंतर ती लोकहितासाठी वापरण्याऐवजी वैयक्तिक किंवा पक्षीय हितासाठी वापरली जात असेल, तर त्याचा फटका थेट सामान्य नागरिकांना बसतो. विकासकामे रखडतात, आर्थिक व्यवहार संशयाच्या भोवऱ्यात अडकतात आणि जनतेचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो. आज गरज आहे ती प्रशासनाने निष्पक्ष, निर्भय आणि वेळेत निर्णय घेण्याची. चौकशी अहवाल असतील, तक्रारी असतील किंवा फेर अंकेक्षणाची आवश्यकता असेल, तर ती केवळ कागदोपत्री न ठेवता प्रत्यक्षात अमलात आणली पाहिजे. अन्यथा 'कारवाई होणार' या घोषणांवर जनतेचा विश्वास उरणार नाही. याचवेळी राजकीय पक्षांनीही आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणापेक्षा स्वच्छ कारभार, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर भर देणे ही काळाची गरज आहे. विरोधकांना दोष देण्याऐवजी स्वतःच्या कार्यपद्धती सुधारण्याची तयारी दाखवली, तरच लोकशाही अधिक बळकट होईल. अग्रलेखाचा शेवट करताना एवढेच म्हणावेसे वाटते की, लोकशाही ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून, ती दररोजच्या कारभारातून सिद्ध करावी लागते. प्रशासन, राजकारणी आणि जनता—या तिघांनीही आपली जबाबदारी ओळखली, तरच विश्वास, पारदर्शकता आणि सुशासन या मूल्यांना खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त होईल.

# पृथ्वी परिभ्रमणाचे महत्त्व फार

पृथ्वीचा परिभ्रमण दिवस ८ जानेवारी रोजी साजरा केला जातो. हा दिवस हा शोध दर्शवितो की आपला ग्रह दर २४ तासांनी त्याच्या अक्षावर फिरतो. पृथ्वीचा परिभ्रमण दिवस- दरवर्षी ८ जानेवारी हा पृथ्वी परिभ्रमण दिवस म्हणून ओळखला जातो. पृथ्वीचे परिभ्रमण किंवा पृथ्वीचे फिरणे म्हणजे पृथ्वीच्या स्वतःच्या अक्षाभोवती ग्रहाचे फिरणे, तसेच अवकाशातील परिभ्रमण अक्षाच्या अभिमुखतेतील बदल होय. पृथ्वी पूर्वेकडे, प्रोग्रेड मोशनमध्ये फिरते. उत्तर ध्रुवीय तारा पोलारिसवरून पाहिल्याप्रमाणे, पृथ्वी घड्याळाच्या उलट दिशेने वळते. डीप स्पेस क्लायमेट ऑब्झर्व्हेटरीद्वारे चित्रित केलेले पृथ्वीचे परिभ्रमण, झुकाव दर्शवित आहे, उत्तर ध्रुव, ज्याला भौगोलिक उत्तर ध्रुव किंवा स्थलीय उत्तर ध्रुव असेही म्हटले जाते, हा उत्तर गोलार्धातील एक बिंदू आहे जिथे पृथ्वीचा परिभ्रमण अक्ष त्याच्या पृष्ठभागाला भेटतो. हा बिंदू पृथ्वीच्या उत्तर चुंबकीय ध्रुवापासून वेगळा आहे. दक्षिण ध्रुव हा दुसरा बिंदू आहे जिथे पृथ्वीचा परिभ्रमण अक्ष त्याच्या पृष्ठभागाला छेदतो, अंटार्क्टिकामध्ये.

पृथ्वी सूर्याच्या संदर्भात २४ तासांतून एकदा फिरते, परंतु इतर दूरच्या ताऱ्यांच्या संदर्भात दर २३ तास ५६ मिनिटे आणि ४ सेकंदांनी एकदा फिरतात. पृथ्वीचे फिरणे कालांतराने थोडे कमी होत आहे, अशा प्रकारे, पृथ्वी एक दिवस लहान होईल. हे पृथ्वीच्या परिभ्रमणावर चंद्राच्या भरतीच्या प्रभावामुळे होते. अणु घड्याळे हे दर्शविते की आधुनिक दिवस एका शतकापूर्वीच्या तुलनेत सुमारे १.७ मिलीसेकंदांनी मोठा आहे, हळूहळू यूटीसी लीप सेकंदांद्वारे समायोजित केला जातो. ऐतिहासिक खगोलशास्त्रीय नोंदींचे विश्लेषण मंद गती दर्शवते; ८व्या शतकापासून एका दिवसाची लांबी प्रति शतक सुमारे २.३ मिलीसेकंदने वाढली आहे. शास्त्रज्ञांनी नोंदवले की सन २०२०मध्ये पृथ्वी वेगाने फिरू लागली होती, पूर्वीच्या दशकांमध्ये दररोज ८६,४०० सेकंदांपेक्षा कमी गतीने फिरत होती. दि.२९ जून २०२२ रोजी पृथ्वीची फिरकी २४ तासांत १.५९ मिलीसेकंदात पूर्ण झाली आणि एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. त्या प्रवृत्तीमुळे जगभरातील अभियंते निगेटिव्ह लीप सेकंड आणि इतर संभाव्य टाइमकीपिंग उपायांवर चर्चा करत आहेत. वेगातील ही वाढ त्याच्या वितळलेल्या गाभा, महासागर आणि वातावरणाची गुंतागुंतीची गती, चंद्रासारख्या खगोलीय पिंडांचा प्रभाव आणि पृथ्वीच्या ध्रुवांवर बर्फ निर्माण करणाऱ्या हवामानातील बदल यासह विविध कारणांमुळे झाल्याचे मानले जाते. वितळणे विषुववृत्ताभोवती उभ्या असलेल्या ओबलेट गोलाकार आकाराचा पृथ्वीचा आकार बर्फाचा वस्तुमान आहे. जेव्हा हे वस्तुमान कमी केले जाते, तेव्हा ध्रुव वजन कमी झाल्यामुळे परत फिरतात आणि पृथ्वी अधिक गोलाकार बनते, ज्यामुळे वस्तुमान त्याच्या गुरुत्वाकर्षणाच्या केंद्राच्या जवळ आणण्याचा परिणाम होतो. कोनीय संवेगाचे संरक्षण हे ठरवते की त्याच्या गुरुत्वाकर्षणाच्या केंद्राभोवती अधिक जवळ वितरीत केलेले वस्तुमान अधिक वेगाने फिरते.

इतिहासः नेपाळी हिमालयाच्या वरच्या रात्रीच्या उत्तरेकडील आकाशाचा हा दीर्घ-प्रदर्शनी फोटो पृथ्वी फिरत असताना ताऱ्यांचे स्पष्ट मार्ग दाखवतो. प्राचीन ग्रीक लोकांमध्ये, पायथागोरियन शाळांपैकी अनेकांचा विश्वास होता की आकाशाच्या दैनंदिन रोटेशनपेक्षा पृथ्वीच्या फिरण्यावर विश्वास होता. कदाचित पहिला फिलोलस- ४७०-३८५ बीसीई होता, जरी त्याची प्रणाली क्लिष्ट होती, ज्यामध्ये मध्यवर्ती आगीबद्दल प्रति-पृथ्वी फिरत होती. तथापि, ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात ऍरिस्टॉटलने फिलॉलॉसच्या कल्पना निरीक्षणाऐवजी सिद्धांतावर आधारित असल्याची टीका केली. त्याने पृथ्वीभोवती फिरणाऱ्या स्थिर ताऱ्यांच्या गोलाची कल्पना मांडली. नंतर आलेल्या बहुतेकांनी हे मान्य केले, विशेषतः क्लॉडियस टॉलेमी-२रे शतक, ज्यांना वाटले की पृथ्वी फिरली तर वादळी वाऱ्यांमुळे त्याचा नाश होईल. ४९९ सीई मध्ये, भारतीय खगोलशास्त्रज्ञ आर्यभट्ट यांनी असे सुचवले की गोलाकार पृथ्वी आपल्या अक्षाभोवती दररोज फिरते आणि ताऱ्यांची स्पष्ट हालचाल ही पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे होणारी सापेक्ष गती आहे. त्यांनी पुढील उपमा दिली, "ज्याप्रमाणे एका दिशेला जाणाऱ्या बोटीतील माणसाला काठावरील स्थिर वस्तू विरुद्ध दिशेने जाताना दिसतात, त्याचप्रमाणे लंकेतील माणसाला स्थिर तारे पश्चिमेकडे जाताना दिसतात."

१०व्या शतकात, काही मुस्लिम खगोलशास्त्रज्ञांनी स्वीकारले की पृथ्वी आपल्या अक्षाभोवती फिरते. अल-बिरुनीच्या मते, अल-सिज्जी (डीसी-१०२०) यांनी त्याच्या काही समकालीनांच्या विश्वासावर आधारित अल-झुराकी नावाच्या ज्योतिषशास्त्राचा शोध लावला "आम्ही पाहत असलेली गती पृथ्वीच्या हालचालीमुळे आहे, पृथ्वीच्या आसाच्या हालचालीमुळे नाही." या मताच्या प्रचलिततेला १३व्या शतकातील एका संदर्भाद्वारे पुष्टी दिली जाते ज्यामध्ये असे म्हटले आहे, "भूमापक किंवा अभियंते, मुहांडिसिननुसार, पृथ्वी सतत वर्तुळाकार गतीमध्ये आहे आणि काय दिसते? आकाशाची हालचाल पृथ्वीच्या गतीमुळे होते, ताऱ्यांच्या गतीने नाही." त्याच्या संभाव्यतेवर चर्चा करण्यासाठी, एकतर खंडन म्हणून किंवा टॉलेमीच्या त्याविरुद्धच्या युक्तिवादांबद्दल शंका व्यक्त करण्यासाठी ग्रंथ लिहिले गेले. मराघा आणि समरकंद वेधशाळांमध्ये तुसी (जन्म १२०१) आणि कुशजी (जन्म १४०३) यांनी पृथ्वीच्या परिभ्रमणाची चर्चा केली; त्यांनी वापरलेले युक्तिवाद आणि पुरावे कोपर्निकसने वापरलेल्या पुराव्यांसारखे आहेत. मध्ययुगीन युरोपमध्ये, थॉमस ऍक्विनासने ऍरिस्टॉटलचे मत स्वीकारले आणि म्हणूनच, चौदाव्या शतकात जॉन बुरिदान आणि निकोल ओरेस्मे यांनी अनिच्छेने स्वीकारले. सन १५४३मध्ये निकोलस कोपर्निकसने सूर्यकेंद्री जागतिक प्रणाली स्वीकारल्याशिवाय पृथ्वीच्या परिभ्रमणाची समकालीन समज प्रस्थापित होऊ लागली नाही. कोपर्निकसने निदर्शनास आणून दिले की जर पृथ्वीची हालचाल हिंसक असेल, तर ताऱ्यांची हालचाल त्याहून अधिक असली पाहिजे. त्यांनी पायथागोरियन्सचे योगदान मान्य केले आणि सापेक्ष गतीच्या उदाहरणांकडे लक्ष वेधले. कोपर्निकससाठी, मध्य सूर्याभोवती प्रदक्षिणा घालणाऱ्या ग्रहांचा सोपा नमुना स्थापित करण्याची ही पहिली पायरी होती.

टायको ब्राहे, ज्याने अचूक निरीक्षणे तयार केली ज्यावर केप्लरने ग्रहांच्या गतीचे नियम आधारित केले, कोपर्निकसच्या कार्याचा उपयोग स्थिर पृथ्वी गृहीत धरणाऱ्या प्रणालीचा आधार म्हणून केला. सन १६००मध्ये, विल्यम गिल्बर्टने पृथ्वीच्या चुंबकत्वावरील त्याच्या ग्रंथात पृथ्वीच्या परिभ्रमणाचे जोरदार समर्थन केले आणि त्यामुळे त्याच्या अनेक समकालीनांवर प्रभाव पडला. २०८गिल्बर्ट सारख्या ज्यांनी सूर्याविषयी पृथ्वीच्या हालचालीचे उघडपणे समर्थन केले नाही किंवा नाकारले नाही, त्यांना अर्ध-कोपर्निकन्स म्हणतात. २२१ कोपर्निकसच्या एका शतकानंतर, रिकिओलीने घसरणाऱ्या शरीरात तत्कालीन-निरीक्षण करण्यायोग्य पूर्वेकडे विक्षेपण नसल्यामुळे फिरणाऱ्या पृथ्वीच्या मॉडेलवर विवाद केला; अशा विक्षेपणांना नंतर कोरिओलिस इफेक्ट म्हटले जाईल. तथापि, केप्लर, गॅलिलिओ आणि न्यूटन यांच्या योगदानाने पृथ्वीच्या परिभ्रमणाच्या सिद्धांताला पाठिंबा मिळवून दिला. पृथ्वी परिभ्रमण दिन आपल्याला निसर्गाच्या या अद्भुत चक्राबद्दल विचार करण्यास प्रवृत्त करतो. हा दिवस आपल्याला पृथ्वीच्या पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आणि निसर्गाशी सुसंगत जीवन जगण्याचे महत्त्व सांगतो. पृथ्वीवरील संतुलन जपण्यासाठी मानवाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज आहे. (विविध समाज माध्यमांवरुन साभार जी !)

!! पृथ्वी परिभ्रमण दिनाच्या सर्वांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**(एक आकाश निरीक्षक)**
**रामनगर वॉर्ड नं.20, प्रभाग क्र.04, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

# मराठी शाळा आणि मराठी भाषा वाचवा देश घडवा...

"भाषा मरते तेव्हा संस्कृती मरते," असे म्हटले जाते. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची, संत परंपरेची, महापुरुषांच्या त्यागाची आणि आपल्या अस्मितेची जननी आहे. मात्र आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजीच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी भाषा आणि प्रामुख्याने मराठी शाळा एका मोठ्या संकटातून जात आहेत. नुकताचं आदरणीय डॉ. तारा भवाळकर ज्या मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक, संशोधक आणि लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत. त्यांचे मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रात मोलाचे योगदान आहे. तसेचं मागच्या वर्षी दिल्ली येथे झालेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या त्या अध्यक्ष होत्या. त्यांनी मराठी भाषा आणी मराठी शाळा याविषयी आपले विचार पुढील प्रमाणे व्यक्त करतांना सांगीतले की, प्राथमिक स्तरावर शिकणाऱ्या मुलांच्या कोवळ्या मनावर अन्य भाषांचे ओझे लादणे अयोग्य आहे.मुलांच्या नैसर्गिक विकासासाठी त्यांना मातृभाषेतूनचं शिक्षण मिळणे गरजेचे असून,अन्य भाषांची सक्ती त्यांच्यावर करु नका...

यावर्षी सातारा येथे संपन्न झालेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी मराठी शाळांच्या संदर्भात आपले विचार पुढील प्रमाणे व्यक्त केले. मी ज्या शाळेत शिकलो, त्या वर्गाचा पट केवळ पाच होता. जर आजच्यासारखे पटसंख्येचे जाचक नियम त्याकाळी असते तर माझी शाळा कधीच बंद झाली असती आणि मी इथपर्यंत पोहोचलोचं नसतो. इंग्रजी माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी शाळांची होणारी गळती थांबविणे ही केवळ सरकारचीचं नव्हे तर समाजाचीही नैतिक जबाबदारी आहे. मराठी शाळा चालायलाचं हवी, कारण उद्याचा सुजाण नागरिक याचं मराठी शाळांमधून घडणार आहे.

चिन्मयी सुमित एक मराठी अभिनेत्री आहेत. गेल्या 15 वर्षापासून त्या सामाजीक तसेचं मराठी भाषा चळवळीत आहेत. मराठी अभ्यास केंद्रातर्फे त्या काम करत आहेत. सध्या त्या खुप चर्चेत आहेत कारण त्या त्यांच्या भाषणाची सुरुवात 'जय भीम' आणी नमस्कार म्हणून करतात. त्यांना अनेक प्रश्न विचारले जातात जसे तुम्ही त्यांच्यातल्या का? वगैरे...आज डिजीटल युगात वावरतांना हा प्रश्न कितपत योग्य वाटतो? हा संशोधनाचा विषय आहे. आपल्याला सर्वांना आपल्या बुध्दीच्या आणि विचाराच्या कक्षा रुंदावणे गरजेचे आहे. मराठी भाषा टिकावी मराठी शाळा कायम राहाव्यात यासाठी त्या आंदोलने देखील करत आहेत.

त्यानंतर मराठीतील प्रतिभावान अभिनेता आणि दिग्दर्शक हेमंत ढोमे यांनी 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' या चित्रपटाद्वारे बंद होत असलेल्या मराठी शाळा या विषयावर प्रकाश टाकला आहे. त्या अनुषंगाने या विषयाला आणखी बळ मिळाले त्यानिमित्ताने हा लेख...मराठी शाळा आणी मराठी भाषा हा विषय चं सध्या ज्वलंत विषय आहे. बर्नींग इश्यु ज्याला म्हणतात.आपल्या इथे फार चांगले आहे. लोक फार लवकर विसरतात परंतु सिनेमा द्वारे जेव्हा विषय मांडल्या जातो तेव्हा त्याचा जाताच प्रभाव जनतेवर पडतो हे एक प्रकारे चांगलं चं आहे.

जागतिकीकरणानंतर इंग्रजीच्या वाढत्या प्रभावाने मराठी माध्यमांच्या शाळांना ओहोटी लागली आहे. इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतले की, मुलांचे करिअर चांगले घडते, त्यांना लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळतात अशी अंधश्रद्धा समाजात सर्वदूर पसरली आहे. आपण लक्षात घेतले पाहीजे की, इंग्रजी ही भाषा आहे ज्ञान नव्हे ती शिकणे म्हणजे कौशल्य हस्तगत करणे होय. त्यामुळे गरीबातले गरीब पालक पोटाला चिमटा काढून इंग्रजी शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेतात. त्यामुळे अनेक राजकारणातल्या शिक्षणसम्राटांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा बाजार सुरू केला. पदवी स्तरावर देखील आज विद्यार्थी मराठी माध्यमाला कमी लेखतात आणी इंग्रजी च्या मागे लागतात. इंग्रजी चा 'ई' देखील कळत नसलेला विद्यार्थी इंग्रजी माध्यम घेतो आणी पोपटपंची करुन विद्यापीठाचे पेपर सोडवतो. याठिकाणी फक्त त्याला गुण मिळतात कारण आमचे पेपर तपासणारे विद्यापीठातील परीक्षक इंग्रजी माध्यम आहे. म्हणजे पोरगा हुशार आहे असं समजुन सढळ हाताने गुणदान करतात.अशी असतांना असलेली परिस्थिती आहे.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण एक उत्तम लेखक होते. त्यांनी उच्च शिक्षण मातृभाषेतुन चं असावे यासाठी आग्रह धरला होता. परंतु आजची परिस्थिती वेगळी चं आहे.एखादी प्राथमिक शाळा बंद पडते तेव्हा एक संस्कारपीठ लुप्त होते. मराठी शाळांनी पिढ्या घडवल्या. मानवाला सुसंस्कारित केले. जीवनात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यास सक्षम तर बनवलेचं शिवाय आपल्या देशाशी, आपल्या मातीशी त्यांची घट्ट नाळ जोडली. कला, साहित्य, संगीत आणि संस्कृतीची जोपासना केली. आज मात्र मराठी माध्यमांच्या शाळांवर एकामागून एक घाला पडतो आहे आणि कोणाला त्याचे काही घेणेदेणे नाही अशी अवस्था झालेली आहे. स्वतःला भाषाप्रेमी म्हणवणारे, मराठीचा टेंभा मिरवणारे स्वतःच्या मुलांना आणि नातवंडांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकवतात. आणि वर हेचं महाभाग 'आता ह्या शाळा बंद पडणारचं असे सांगत आपली जबाबदारी झटकतांना दिसत आहेत.

मराठी शाळांमधील शिक्षणाच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्या सुधारण्यासाठी २००६ मध्ये महाराष्ट्र शासनाने 'माधवराव कामत समिती' नियुक्त केली होती, तिने आपला अहवालही सरकारला सादर केला होता. त्यानंतरही शाळा बंद पडण्याचे सत्र सुरूच राहिले. गावोगावच्या मराठी शाळा शाळा बंद पडतात त्यांचे खापर केवळ इंग्रजी माध्यमाकडे मुलांना वळवणाऱ्या पालकांवर न फोडता मुळात ह्या पालकांना इंग्रजी माध्यमाकडे का जावेसे वाटते याची कारणमिमांसा देखील तपासली पाहीजे.. ती पुढीलप्रमाणे १. राज्यातील प्राथमिक शिक्षणाची घसरलेली गुणवत्ता, २. साधनसुविधांचा अभाव, ३. मुलांच्या तुलनेत शिक्षकांची अल्प संख्या, ४. प्राथमिक शिक्षकांना नियमित प्रशिक्षणाचा अभाव, ५. शैक्षणिक साधनांचा अभाव ६. शिक्षकांतील गुणवत्तेचा अभाव. ७. अप्रशिक्षित मराठी प्राथमिक शिक्षकांकडून दिले जाणारे इंग्रजी शिक्षण. हे सगळे सरकारनेचं नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल आहे. "मराठी शाळा वाचवा" ही सामाजिक मोहीम मराठी माध्यमाच्या शाळांची घटती संख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या वाचवण्यासाठी चालवली जात आहे. ज्यात इंग्रजी माध्यमाकडे वाढणारा कल, सरकारकडून अपुरे अनुदान आणि शिक्षणाचे खाजगीकरण यांसारख्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून मराठी शिक्षण टिकवण्यासाठी जनजागृती, आंदोलने आणि सोशल मीडियाद्वारे लोकांपर्यंत पोहोचवून मराठी शाळांना पाठिंबा देण्याचे आवाहन करत आहे. मराठी शाळा वाचविण्यासाठी महाराष्ट्रातील पुढील संस्था एकत्र येऊन लढा देतांना आपल्याला दिसत आहेत जसे मराठी अभ्यास केंद्र, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ, महराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण समिती, शिक्षण विकास मंच यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई, राज्य मुख्याध्यापक महामंडळ, महामुंबई शिक्षण संस्था, ॲक्टीव्ह टीचर्स फोरम, शिक्षक भरती, महाराष्ट्र राज्य नपा व मनपा शिक्षण संघ, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित व अनुदानित शाळा कृती समिती, महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ, महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना, कायद्याने वागा लोकचळवळ, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय मराठी विषय शिक्षक महासंघ, सर फाऊंडेशन, महाराष्ट्र छत्र प्रतिष्ठान, मी मराठी एकीकरण समिती, रात्रशाळा प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघ, सक्षम फाऊंडेशन, स्पर्धा परीक्षा समन्वय समिती अशा विविध संघटना आहेत.एकीकडे मराठी भाषेचे जतन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असताना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा सुरु असताना दुसरीकडे 'आपुल्या घरात हाल सोसते मराठी' असाच काहीसा प्रकार समोर येतांना दिसतो. ' एबीपी माझा'या वाहीनीने देखील या संदर्भात आपला विशेष अहवाल जनतेसमोर सादर केला आहे. त्याचप्रमाणे सर्वच राजकीय पक्ष मराठीच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त करत असतांना दिसत आहे.

एकीकडे सीबीएसई, आयसीएसई आणि केंब्रिज बोर्डाच्या शाळांकडे मराठी विद्यार्थी पालकांचा ओढा वाढतोय.परिणामी या शाळांच्या तुलनेत मराठी शाळा मात्र या स्पर्धेत बंद पडायला लागल्याचं चित्र आहे. मराठी शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी खरंच पावले उचलली जात आहेत का? की मराठी शाळा अशाच बंद होत राहतील? असे अनेक प्रश्न आज 'आ'वासुन उभे आहेत. मराठी शाळांमध्ये पटसंख्या कमी होण्यामागचे नेमकी कारणे काय? या प्रश्नांच्या उत्तरात ढोबळमानाने खालील बाबी प्रकर्षाने आढळून येतात १.पालकांचा इंग्रजी शाळांकडे वाढता ओढा२. इतर शाळांच्या तुलनेत मराठी शाळांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह ३.शिक्षकांना दिलेले जाणारे इतर कामे व त्यामुळे वर्गात शिकवायला मिळणारा कमी वेळ ४. मराठी शाळांसाठी येणारे प्रकल्प आणि त्याची होणारी प्रत्यक्ष अंमलबजावणी यातील अडचणी...शेवटी सगळचं राजकारण्यांवर सोडून उपयोग नाही. त्यासाठी जनतेने ठोस भूमिका घेणं गरजेचे आहे.

महाराष्ट्रात आज 'मराठी भाषा' अभिजात झाली आहे. याचा अभिमान महाराष्ट्रात मिरवला जातो. पण त्याच वेळी राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा एकामागोमाग एक बंद पडत चालल्या आहेत. हे समाज वास्तव आहे. 'शिक्षण बाजारू झालं आहे', 'मराठी शाळांवर चाललेला बुलडोझर थांबणार कधी?', 'मराठी भाषा अभिजात झाली; पण मराठी शाळा अभिजात कधी होणार?' हे आजच्या महाराष्ट्राच्या शैक्षणिक वास्तव आहे. प्रशासन, राज्य सरकार, पालक आणि समाज एकमेकांकडे बोट दाखवत असताना मराठी माध्यमाच्या शाळांच्या अस्तित्वावरचं प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. अशी परिस्थिती आहे. 'मराठी शाळा संपणार की पुन्हा भरणार?' हा प्रश्न प्रत्येक मराठी माणसाच्या मनात घर करतो. कारण याचं उत्तर राज्यकर्ते प्रशासनाच्या खुर्चीइतकंच आपल्या प्रत्येकाच्या कृतीत आहे. कारण मराठीतून शिक्षण घेऊन घडलेली पिढी किती सक्षम, हुशार आणि विविध क्षेत्रांत यशस्वी होऊ शकते हे आपल्या सर्वांना चांगलं ठाऊक आहे.

गेल्या २ वर्षात ३० ते ४० मराठी शाळा बंद पडल्या... जवळपास ३९४ मराठी शाळांमध्ये शिकण्यासाठी विद्यार्थीच नाही आहेत... आणि ८००० शाळांमध्ये तर प्रत्येकी १० पेक्षा कमी विद्यार्थी शिकत आहेत... "मराठी भाषा अभिजात झाली, पण मग मराठी शाळांचं काय? कारखाना आणि छापखाना यात अंतर असतं आणि मराठी शाळा या कारखाना आहेत" म्हणजे चांगला सुजाण नागरिक घडविण्याचा जो राष्ट्राचा विकास करेल..मराठी भाषा टिकवण्यासाठी मराठी शाळा टिकवल्या गेल्या पाहिजेत हा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. डॉ. प्रकाश बाबा आमटे यांचे मराठी शाळा आणी मराठी भाषा यावर फार मौलिक विचार आहेत ते पुढीलप्रमाणे ते म्हणतात आम्ही आमच्या कुटुंबातील सर्वजण मराठी माध्यमातून शिकलो. आता नातवंडेदेखील मराठी माध्यमातून शिकत आहेत. आणि आम्हाला याचा अजिबात पश्चाताप नाही उलट अभिमान आहे. हे इंग्रजी आहे काय हो? इंग्रजी बोलता, लिहिता आलं पाहिजे... जगाबरोबर वावरायचं तर इंग्रजी भाषा महत्वाची आहे. हे सगळ मान्य आहे याचा अर्थ असा होत नाही की, आम्ही आपल्या संस्कृतीवर, बोली भाषेवर घाला घालायचा... मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. पाल्यांना मराठी शाळेत घालण्याचा पालकांचाचं कल नाही. असं चित्र सध्या समाजात पाहायला मिळते. स्पर्धेत टिकायचे असेल तर इंग्रजी शाळांवाचून पर्याय नाही या गैरसमजातून आता पालकांना बाहेर काढणे एक दिव्य चं आहे.

आज इंग्रजीचा एक वेगळाच ट्रेंड निर्माण झाला आहे. गाव, खेड्यात ही पालक मुलांना इंग्रजी शाळेत टाकत आहेत. आपल्या मुलांना ते झेपते का? त्यासाठी तो तयार आहे का? याकडे देखील त्यांचे लक्ष नसते. फक्त शाळा इंग्रजी माध्यमाची पाहिजे. त्या शाळेत काय चालतं ? कस शिकवलं जात? याकडे विशेष लक्ष दिल्या जात नाही. त्यामुळे ह्या शाळा पालकांच्या भावनिकतेचा फायदा घेऊन भरमसाट ॲडमीशन फी घेतात. आजकाल सोशल स्टेटस हे खुळ फार प्रचलित झाले आहे. तुमचा पोरगा कोणत्या शाळेत जातो यावरुन आपले सोशल स्टेटस ठरते. ह्या फी कधी कधी सामान्य माणसाला मेताकुटीला आणतात. यामध्ये मात्र सामान्य माणूस पुरता कोलमडतो.

राष्ट्रपिता महात्मा फुलेंपासून ते शिक्षणमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ पंजाबराव देशमुख यांच्या पर्यंत सर्वच समाजसुधारकांनी रक्ताचं पाणी करून उभारलेल्या शाळा आज ओस पडण्याच्या स्थितीत आहेत. त्याबद्दल सकारात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक शिक्षण व्यवस्थेच्या आधारे त्या सर्व शैक्षणिक सुविधांनी सुसज्ज करणे काळाची गरज आहे. आज आपण सर्वांनी खाजगी शाळांच्या मनमानीवर अंकुश ठेवला नाही तर शिक्षण क्षेत्राचा बट्याबोळ झाल्याशिवाय राहणार नाही. हे निश्चित...ग्रामीण भागातील गरीब शेतकरी कष्टकरी आधीचं निसर्गाच्या तसेचं राज्यकर्त्यांच्या शोषणाच्या धोरणांमुळे आधीचं बेहाल असतांना त्याला परवडेल असं शिक्षण फक्त मराठी शाळाचं देवू शकतात हे त्रिकालाबाधीत सत्य आहे. ग्रामीण भागातील पालकांच्या मनातील मराठी शिक्षणाबद्दलचा झालेला समज आपण सर्वांनी मिळून दूर केला पाहिजे. आपल्या मुलांना मराठी शाळेत टाका. त्यांना तिथेच योग्य शिक्षण मिळेल.हे त्यांना पटवून सांगणे गरजेचे आहे. आपल्या मुलाला इंग्रजी बोलता व शिकता आले पाहीजे तरचं त्याला चांगली नोकरी मिळेल. आपल्यासारखं कष्टाचे जीवन त्याच्या वाट्याला नाही यावे या काळजीने तो ग्रस्त असतो हि त्याच्या मनातील काळजी हा न्यूनगंड आपण त्याच्या मनातुन पुसून टाकला पाहिजे.

भविष्यातील इंग्रजी शाळांच्या मनमानीचा धोका ओळखून आजच यावर उपाययोजना आखली पाहिजे, यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने पुढाकार घेणे अपेक्षित आहे. कारण आपल्या मराठी शाळेत देखील दर्जेदार इंग्रजी शिकवणारे शिक्षक नेमून विद्यार्थ्यांना घडवले पाहीजे. इंग्रजी भाषा शिकणे हे फक्त एक कौशल्य आहे. ज्ञान मिळवणे नाही. कारण आंतरराष्ट्रीय स्तरावर आपण कमी पडायला नको हाचं उद्देश आहे. आणी कौशल्य आत्मसात करणे कठीण नसते. त्याचप्रमाणे आपल्या मराठी शाळेला आधुनिकतेची जोड त्याचप्रमाणे शिक्षण पद्धतीत सुधारणा करून शाळा सर्वांगीण सक्षम करणे हा पर्यायचं मराठी शाळेला वाचवू शकतो. मराठी भाषा ही आपली 'मायबोली' आहे. तिचे संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे. मराठी शाळा समृद्ध झाल्या, तरचं मराठी भाषा टिकेल आणि वृद्धिंगत होईल. आपण सर्वांनी मिळून मराठी शाळांना बळ देऊ या आणि आपल्या भाषेचा अभिमान बाळगू या."मराठी पाऊल पडते पुढे... पण ते आपल्या भाषेच्या बळावरचं पडायला हवे!"

प्रा. राहुल गोवर्धन माहुरे,
शांतीनगर, जुनेशहर,
अकोला मोबा. 9822278925

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### नवी मुंबईतील भाजप उमेदवाराला दिलासा

मुंबई- आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र राजकीय प्रचार सभा सुरू आहेत. येत्या 15 जानेवारी रोजी मतदान होणार असून 16 तारखेला निकाल जाहीर होणार आहे. राजकीय नेत्यांनी एकमेकांवर टीका टिप्पणी सुरू केली असून दुसरीकडे अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी राज्यात 70 उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने विरोधकांनी टीका केली होती. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात विरोधी पक्षातील नेत्यांनी याचिका दाखल केली होती. यावर आता नवी मुंबईतील प्रभाग 17 (अ) च्या निवडणुकीला मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे आता 15 तारखेला मतदान होणार की नाही? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.नवी मुंबईतील प्रभाग क्रमांक 17 (अ) मधून भाजप उमेदवार नीलेश भोजने यांना न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. कारण निवडणूक आयोगाने त्यांचा उमेदवारी अर्ज फेटाळला होता. त्या संदर्भात त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. याच प्रकरणी न्यायालयाने येथील निवडणुकीला अंतरिम स्थगिती दिली असून येत्या शुक्रवारी पुन्हा सुनावणी होणार आहे.




### तेलंगणात कार दुभाजकाला धडकली, 4 विद्यार्थ्यांचा मृत्यू



तेलंगणा : तेलंगणातील रंगारेड्डी जिल्ह्यातील चेवेल्ला परिसरात बुधवारी रात्री उशिरा एका भरधाव कारची डिवाइडरला धडक बसली. या अपघातात आयसीएफएआय बिझनेस स्कूलच्या चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. अपघातात एक विद्यार्थिनी जखमी झाली असून, तिची प्रकृती गंभीर आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, कार डिवाइडरला धडकल्यानंतर झाडात घुसली. पोलिसांनी सांगितले की, हा अपघात रात्री दीडच्या सुमारास मोकीला पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाला. सर्व विद्यार्थी मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीतून परत येत होते. वेगाने गाडी चालवत असल्यामुळे चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले.

पोलिसांनी सांगितले की, सर्व मृत आणि जखमींची ओळख पटली आहे. मृतांची नावे कारगयाला सुमित (20), निखिल (20), देवाला सूर्या तेजा (20) आणि बलमूरी रोहित (18) अशी आहेत. जखमी विद्यार्थिनीचे नाव सुंकारी नक्षत्रा आहे. पोलिसांनी सांगितले की, पीडितेला तात्काळ रुग्णालयात पाठवण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.




# ना बाण, ना खान: संभाजीनगरात फडणवीसांची नवी घोषणा

## येत्या 2 महिन्यात पाणीप्रश्न सोडवणार, शिवसेनेमुळे युती तुटल्याचा दावा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- 'ना बाण, ना खान. आता फक्त भगव्याची शान', अशी नवी घोषणा गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये केली. येथील युती फक्त शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांमुळे तुटली असा दावा त्यांनी केला. सोबतच शहर खड्डेमुक्त करू. संभाजीनगरचा पाणीप्रश्न दोन महिन्यात सोडवू, असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला.आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी प्रचार सुरू केला आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आले असता त्यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला. यात त्यांनी संभाजीनगरच्या विकासासाठी करण्यात आलेल्या योजना तसेच निधींच्या तरतुदीबद्दल माहिती दिली. तसेच शहराच्या विकासाचे नवे व्हीजनही मांडले.देवेंद्र फडणवीस म्हणाले, डीएमआयसीमध्ये देखील आपल्याला अधिकची जागा लागणार आहे. दोन एमआयडीसीला जोडण्याचे काम हाती घेतले आहे. 2015 साली छत्रपती संभाजीनगरच्या रस्त्यांसाठी 100 कोटी दिले होते आणि तेव्हापासून रस्ते आपल्याला मोठे करता येतात ही भावना तयार झाली. आता मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू झाली आहे. शहरातील सगळे डीपी रोड अतिक्रमणमुक्त करणार असल्याचा अजेंडा असणार आहे. तसेच खड्डेमुक्त संभाजीनगर आपल्याला पाहायला मिळेल.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिल्यांदा तर आपल्या सगळ्यांसाठी एक गुड न्यूज आहे की आज आपण पाण्याच्या योजनेच्या पंपाची चाचणी यशस्वी केली आहे. इथला जो पाण्याचा प्रश्न होता, मागच्यावेळी मी मुख्यमंत्री होतो तेव्हा आपण एका झटक्यात 1600 कोटींची योजना आपण मंजूर केली होती. तसेच अनुदानावर ही योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर उद्धव ठाकरेंची सत्ता आल्यानंतर या योजनेचा खोळंबा झाला. आता ही योजना 2700 कोटींची झाली असून पुढील 2 महिन्यात पाण्याचा प्रश्न सुटेल.औद्योगिक विकासासोबत आपल्याला अर्बन इनफ्रास्ट्रक्चर देखील सुरू विकसित करावे लागणार आहे. 2014 साली मोदीजी जेव्हा सत्तेवर आले तेव्हा शहराचच्या विकासावर काम करण्यास सुरू केले. संभाजीनगर सारख्या शहराला पूर्वी निधी मिळत नव्हता, आता शहरांच्या विकासासाठी निधी पुरवठा केला जात आहे. तसेच जोपर्यंत शहराचा आर्थिक विकास होत नाही, तोपर्यंत अर्बन इनफ्रास्ट्रक्चर कोपअप होत नाही. या औद्योगीक विकासामुळे संपूर्ण शहराचा विकास होणार आहे, असे आश्वासन देखील देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

उद्योजकासंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की उद्योजक संभाजीनगरच्या प्रेमात पडतात. आता दावोसमधून संभाजीनगरसाठी आणखी निधी आणणार असल्याचे देखील यावेळी त्यांनी आश्वासन दिले आहे. इतकेच नव्हे तर एआयबाबतचे जागतिक सतरावरील काम संभाजीनगरातून होत असल्याची देखील माहिती फडणवीस यांनी दिली आहे.समृद्धी



महामार्गासारखा महामार्ग असावा अशी कल्पना कधी आली? असा प्रश्न विचारण्यात आला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, याची कल्पना मी 2001 साली महाराष्ट्राच्या विधानसभेत मांडली होती. नागपूर ते मुंबई असा महामार्ग तयार करण्यात यावा, अशी माझी कल्पना होती. त्याकाळी मी कम्युनिकेशन सुपर एक्सप्रेसवे म्हटले होते, तेव्हा आयटीचा कल होता. परंतु, तेव्हा ते झाले नाही. पण जेव्हा मी 2014 ला मुख्यमंत्री बनलो आणि या महामार्गाचे काम सुरू करण्याचे ठरवले. नागपूर ते मुंबई अशी मी सरळ रेष मारली आणि असा रोड आपल्याला हवा आहे, असे मी अधिकाऱ्यांना सांगितले. त्यावेळी विरोधकांनी शेतकऱ्यांना सांगितले की या महामार्गासाठी एक इंच जागा देऊ नका, पण मी यावर मात करत हा रस्ता पूर्ण केला.


# अर्ज फेटाळलेल्या उमेदवारांना न्यायालयाचा दिलासा!

## निवडणूक अधिकाऱ्यांच्या कारभाराविरोधात याचिका; शुक्रवारी सुनावणी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई - पुढील आठवड्यात होणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकीसाठी अर्ज फेटाळल्या गेलेल्या इच्छुक उमेदवारांना आता उच्च न्यायालयाकडून संधी मिळण्याची शक्यता आहे. विविध कारणांमुळे बाद ठरवण्यात आलेले अर्ज पुन्हा स्वीकारले जावेत, या मागणीसाठी उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली असून, प्रकरणाचे गांभीर्य ओळखून न्यायालयाने यावर शुक्रवारी तातडीने सुनावणी घेण्याचे निश्चित केले आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीच्या विभाग क्रमांक 1 ते 227 च्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आणि आयुक्तांनी उमेदवारांचे अर्ज फेटाळल्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली हे अर्ज बाद करण्यात आल्याचा संशय




याचिकाकर्त्यांनी व्यक्त केला असून, अर्ज भरण्यासाठी दिलेली सात दिवसांची मुदत अत्यंत अपुरी असल्याचा दावाही या याचिकेत करण्यात आला आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सहमती दर्शवत हे प्रकरण शुक्रवारी सूचीबद्ध केले आहे.

प्रतिज्ञापत्रे किंवा प्रश्न-उत्तर पत्रके योग्य स्वरूपात नसल्याच्या अथवा कायदेशीररीत्या आवश्यक नसलेली पोलीस, पाणी, कर, मलनिस्सारण आणि मालमत्ता यासह पाच विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) सादर करण्यात अयशस्वी झाल्याच्या कारणास्तव कारणास्तव अनेक इच्छुक उमेदवारांचे अर्ज फेटाळण्यात आले होते. परंतु, पाणी, मालमत्ता कर आणि बांधकाम प्रस्ताव यासारखे विभाग महानगरपालिकेच्या थेट प्रशासकीय नियंत्रणाखाली असल्याने ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी मनमानी, अवाजवी आणि घटनेच्या समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. तसेच विरोधी पक्षांच्या उमेदवारांना ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यास विल[illegible]रून राजकीय कटकारस्[illegible]ाची शक्यताही याचिकाकर्त्यांनी वर्तवली आहे.

वांद्रे पूर्व येथील मोझम अली मीर यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत निवडणूक अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात आले असून, किरकोळ आणि तांत्रिक कारणांचा आधार घेऊन विरोधी पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज मनमानीपणे फेटाळल्याचा दावा केला आहे. अधिकाऱ्यांची ही कृती असंवैधानिक आणि अरेरावीची असून, यामुळे अनेक इच्छुकांना निवडणूक लढवण्याच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहावे लागले आहे, असे मीर यांनी म्हटले आहे. महापालिका प्रशासनाचा हा पवित्रा राज्य निवडणूक आयोगाच्या घटनात्मक अधिकारांवर गदा आणणारा असल्याची टीकाही या याचिकेतून करण्यात आली आहे.

# नाशिक-बेंगळुरु विमानसेवेला अचानक थांबा, प्रवाशांसह पर्यटन-उद्योग क्षेत्राला जबरदस्त फटका

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

नाशिक : 'इंडिगो'ने विमान वाहतुकीतील गोंधळ दूर करण्यासाठी सध्याच्या वेळापत्रकात बदल केले असून, नाशिक-बेंगळुरू विमानसेवा तूर्त रद्द करण्यात आली आहे. येत्या 10 फेब्रुवारीनंतर ही सेवा पूर्ववत होण्याची चिन्हे असली, तरी सध्या पर्यटन व उद्योग क्षेत्राला याचा मोठा फटका बसणार आहे.ओझर विमानतळावरून सध्या 'इंडिगो'च्या वतीने नवी दिल्ली, अहमदाबाद, हैदराबाद, नागपूर, इंदूर, गोवा आदी ठिकाणांसाठी विमानसेवा कार्यान्वित आहे. नाशिक-बेंगळुरू सेवाही सुरू होती व तिला उत्तम प्रतिसाद लाभत होता. बेंगळुरू हे उद्योग-व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र असून, अनेक आयटी कंपन्यांची मुख्यालये बेंगळुरूत आहेत. याशिवाय पर्यटनाच्या दृष्टीनेही हे शहर महत्त्वाचे असून, दक्षिण भारतात जाण्यासाठी बेंगळुरू विमानसेवा महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे पर्यटक व




उद्योजकांच्या मागणीनुसार दररोजसाठी नाशिक-बेंगळुरू विमान सुरू करण्यात आले होते.बेंगळुरू येथून दुपारी 1.20 वाजता उड्डाण घेतलेले विमान नाशिकला 3.10 वाजता पोहोचत असे, तर नाशिक येथून दुपारी 3.40 वाजता भरारी घेतलेले विमान बेंगळुरूला सायंकाळी 5.30 वाजता पोहोचत असे. मात्र, गेल्या महिन्याच्या प्रारंभी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या वतीने विमान कंपन्यांसाठी वैमानिक थकव्याविषयी नवे नियम लागू करण्यात आले. त्यानुसार वैमानिकांना विशिष्ट तास विश्रांती देणे सक्तीचे झाले. त्यामुळे 'इंडिगो'च्या विमान वाहतुकीचे नियोजन कोलमडले. अनेक विमाने रद्द होऊन प्रवाशांचे हाल झाले. त्या पार्श्वभूमीवर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने 'इंडिगो'ला 10 फेब्रुवारीपर्यंत फेरनियोजनाची मुदत दिली आहे. त्यामुळे 'इंडिगो'ने अनेक देशांतर्गत विमानोड्डाणे रद्द केली असून, नाशिक-बेंगळुरू विमानालाही फटका बसला आहे. हे विमान 10 फेब्रुवारीपर्यंत रद्द करण्यात आले असून, त्यानंतरही सुरू होण्याबाबत साशंकता आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीतील कर्तव्यपथावर संचलन व अन्य कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव हा भाग 'नो फ्लाय झोन' घोषित करण्यात आला असून, सकाळची विमाने रद्द करण्यात आली आहेत.


# निवडणुकीमुळे शाळकरी विद्यार्थ्यांची लॉटरी!

## वीकेंडआधीच सुट्ट्यांना सुरुवात

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे: महानगरपालिका प्रशासनाने मतदान, मतमोजणी आणि त्यांच्या पूर्वतयारीसाठी अनेक शाळा निश्चित केल्या आहेत. त्यामुळे शहरातील अनेक शाळांना या कालावधीत सुट्टी देण्यात येणार आहे. शाळांनी तशा सूचना पालकांना देण्यास मंगळवारपासून सुरुवात केली.

महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनाने अनेक शाळांमध्ये मतदान केंद्रे निश्चित केली आहेत. तसेच मतमोजणी देखील अनेक शाळांमध्ये होणार आहे. पूर्वतयारीसाठी म्हणून शाळांचा आगाऊ ताबा प्रशासनाकडून



घेतला जाणार आहे. परिणामी शहरातील अनेक शाळांना एकूण चार दिवस सुटी देण्यात येणार आहे. याबाबत शाळांकडून पालकांना सूचना देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. मकरसंक्रातीनिमित्त अनेक शाळांना १४ जानेवारी रोजी सुटी आहे. मतदान १५ जानेवारी, तर मतमोजणी दुसऱ्याच दिवशी १६ जानेवारी रोजी होणार आहे. अनेक शाळांना शनिवार आणि रविवार सुटी असते. तसेच त्यामुळे विद्यार्थ्यांना १४ जानेवारीपासून सुटी मिळणार आहे.

'मतदान केंद्र म्हणून आणि निवडणूकविषयक कामांसाठी शाळेचा परिसर उपयोगात आणला जाणार आहे. त्यामुळे १४, १५, १६ आणि १७ जानेवारी रोजी शाळेला सुटी राहील, अशी सूचना शाळेकडून बुधवारी मिळाली आहे,' असे मयुरी काळे या पालकांनी सांगितले.

# इन्स्टाग्रामवर मुलीशी ओळख, तिच्या मदतीने अमनला बोलावलं, 'दृश्यम'प्रमाणे मोबाईल ट्रकमध्ये फेकला

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे : पुण्यातील विश्रांतवाडी भागातून हरवलेल्या 17 वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण करून चाकूने गळा चिरून दगडाने ठेचून निर्घृण खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. खेड शिवापूर परिसरातून काल बुधवारी दुपारी मुलाचा मृतदेह मिळून आला. 'इन्स्टाग्राम'वर ओळख झालेल्या एका मुलीच्या मदतीने मुलाला खेड शिवापूरमध्ये बोलावल्याचे समोर आले आहे. 'दृश्यम'प्रमाणे आरोपींनी खून करून पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी मृताचा मोबाइल ट्रकमध्ये फेकून दिला. मात्र, पोलिसांनी कौशल्याने तपास करून आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

अमन सुरेंद्रसिंग गच्चड (वय 17, रा. टिंगरेनगर, विश्रांतवाडी) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणी आई अनिता गच्चड (वय 44) यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून प्रथमेश चिंधू आढळ (वय 19, रा. उत्तमनगर), नागेश बालाजी घबले (वय 19, रा. शिवणे) यांना अटक केली असून, दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. अमनचे काही महिन्यांपूर्वी प्रथमेश आढळ याच्यासोबत भांडण झाले होते. अमन आणि त्याच्या मोठ्या भावाने आढळवर कोयत्याने वार केले होते. याप्रकरणी अमन आणि त्याच्या भावावर गुन्हा दाखल झाला होता. मोठा




भाऊ कारागृहात शिक्षा भोगत आहे, तर अमन अल्पवयीन असल्याने त्याला सोडून देण्यात आले होते.

त्यामुळे आढळ अमनला मारण्याचा प्रयत्नात होता; पण भांडणे झाल्याने अमनचे कुटुंब टिंगरेनगरमध्ये राहण्यास आले होते.टिंगरेनगरमध्ये राहण्यास आल्यावर अमनने आरोपींचे नंबर ब्लॉक केले होते. त्यामुळे आरोपींना अमनचा ठावठिकाणा कळत नव्हता. यावेळी एकाने इन्स्टाग्रामवरील मैत्रिणीच्या मदतीने अमनला बोलवले. 29 डिसेंबर 2025 रोजी अमन आणि ती मुलगी कात्रजला भेटल्यावर दुचाकीवरून खेड शिवापूरला गेले. तेथे आरोपींनी अमनचे अपहरण केले.

# प्रियकरासाठी घरभाड्याचे पैसे जमवण्याचा कट; अल्पवयीन प्रेयसीच निघाली दरोड्याची सूत्रधार

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे : प्रियकराला घराचे भाडे देण्यासाठी तीस हजार रुपयांची गरज असल्याने अल्पवयीन प्रेयसीनेच काकाच्या बंगल्यात दरोडा टाकण्याचा कट रचल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणी येरवडा पोलिसांनी प्रियकरासह दोन उच्चशिक्षित तरुणांना अटक केली आहे.

यश मोहन कुऱ्हाडे, (वय 20, रा. केसनंद), ऋषभ प्रदीप सिंह (वय 21, रा. चऱ्होली) आणि राज विवेक भैरामडगीकर (वय 20, रा. येरवडा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत 35 वर्षीय महिलेने फिर्याद दिली.

कल्याणीनगरमध्ये तक्रारदाराचा बंगला आहे. सोमवारी सायंकाळी साडेचारच्या सुमारास अचानक दोन अनोळखी व्यक्ती चाकू, दोरी घेऊन बंगल्यात शिरले. चोरांना पाहून घरातील महिलांनी जोराने आरडाओरडा केल्याने चोरटे पळून गेले होते.

येरवडा पोलिसांनी दोन तरुणांना अटक करून चौकशी केली असता या कटाचे बिंग फुटले. कुऱ्हाडे याचे तक्रारदाराच्या दिराच्या मुलीसोबत प्रेमसंबंध आहेत. घरभाडे देण्यासाठी 30 हजार रुपयांची गरज असल्याचे त्याने प्रेयसीला सांगितले होते. त्यावेळी प्रेयसीने काकाच्या घरी चोरीचा कट रचला.

कुऱ्हाडे आणि त्याचे मित्र दरोडा टाकण्यासाठी येणार असल्याने प्रेयसीने घराचे दार उघडून ठेवले होते. आरोपी घरात शिरताच महिलांनी आरडाओरडा केल्याने दरोड्याचा प्रयत्न फसला. कुऱ्हाडे बारावी नापास असून, ऋषभ सिंह मेकॅनिकल इंजिनिअर आणि भैरामडगीकर हा इंजिनीअरिंगच्या तिसऱ्या वर्षात शिकतो, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंजुम बागवान यांनी दिली.

पुण्यातील विश्रांतवाडी भागातून हरवलेल्या 17 वर्षीय अल्पवयीन मुलाचे अपहरण करून चाकूने गळा चिरून दगडाने ठेचून निर्घृण खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. खेड शिवापूर परिसरातून काल बुधवारी दुपारी मुलाचा मृतदेह मिळून आला.

'इन्स्टाग्राम'वर ओळख झालेल्या एका मुलीच्या मदतीने मुलाला खेड शिवापूरमध्ये बोलावल्याचे समोर आले आहे. 'दृश्यम'प्रमाणे आरोपींनी




खून करून पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी मृताचा मोबाइल ट्रकमध्ये फेकून दिला. मात्र, पोलिसांनी कौशल्याने तपास करून आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

## आरोग्य...

### 1 रूपयाही खर्च न करता नाकाचे ब्लॅकहेड्स काढून छिद्र मोकळी करणारा फाडू उपाय



आपल्या त्वचेवर असलेल्या सूक्ष्म छिद्रांमधून नैसर्गिक तेल बाहेर पडत असते, मात्र जेव्हा बाहेरील प्रदूषण आणि मृत पेशी या छिद्रांना बंद करतात, तेव्हा हवेच्या संपर्कामुळे त्याचे रूपांतर ब्लॅकहेड्समध्ये होते. अनेक जण हे ब्लॅकहेड्स हाताने दाबून काढण्याचा प्रयत्न करतात, परंतु यामुळे त्वचेवर कायमस्वरूपी डाग पडू शकतात किंवा संसर्ग वाढून पिंपल्स येऊ शकतात. नाकावरील ब्लॅकहेड्स काढण्यासाठी 'एक्सफोलिएशन' आणि 'डीप क्लिंजिंग' या दोन प्रक्रिया महत्त्वाच्या आहेत. घरगुती उपायांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ते त्वचेच्या नैसर्गिक रचनेला धक्का न लावता केवळ घाण बाहेर काढतात. साखर, मध, बेकिंग सोडा आणि मुलतानी माती यांसारखे घटक आपल्या स्वयंपाकघरात सहज उपलब्ध असतात आणि ते त्वचेसाठी नैसर्गिक क्लिंजर म्हणून काम करतात.

हे उपाय केवळ नाकावरील ब्लॅकहेड्स काढत नाहीत, तर त्वचेची छिद्रे आतून साफ करून नवीन ब्लॅकहेड्स तयार होण्यास प्रतिबंध करतात. नियमितपणे नैसर्गिक फेसमास्क आणि वाफेचा वापर केल्यास नाकावरील त्वचा मऊ, स्वच्छ आणि चमकदार होते. कोणतेही साईड इफेक्ट्स नसलेले हे नैसर्गिक उपाय संवेदनशील त्वचेसाठी देखील अत्यंत उपयुक्त आहेत. चला तर मग, नाकावरील ब्लॅकहेड्सपासून कायमची सुटका मिळवून देणारे पाच प्रभावी घरगुती उपाय सविस्तरपणे जाणून घेऊया.ब्लॅकहेड्स काढण्यापूर्वी त्वचेला वाफ देणे ही सर्वात महत्त्वाची प्रक्रिया आहे. आठवड्यातून १ ते २ वेळा कोमट पाण्याची वाफ घेतल्यामुळे नाकावरील बंद झालेली रोमछिद्रे उघडतात आणि तिथे घट्ट बसलेले ब्लॅकहेड्स सैल होतात. वाफ घेतल्यामुळे त्वचा मऊ पडते, ज्यामुळे त्यानंतर केलेले स्क्रबिंग अधिक प्रभावी ठरते. वाफ घेतल्यावर हलक्या हाताने ओल्या कपड्याने किंवा सॉफ्ट ब्रशने नाक पुसल्यास ब्लॅकहेड्स सहज बाहेर पडतात आणि त्वचा खोलवर स्वच्छ होते.साखर आणि मधाचे मिश्रण हे ब्लॅकहेड्ससाठी एक उत्तम नैसर्गिक स्क्रब आहे. साखरेचे दाणे मृत त्वचा घासून काढण्याचे काम करतात, तर मधामध्ये असलेले अँटी-ऑक्सिडंट्स त्वचेला मऊ ठेवतात. १ टेबलस्पून साखर आणि मध एकत्र करून नाकावर गोलाकार मसाज केल्यास साचलेली घाण निघून जाते. हा उपाय केवळ ब्लॅकहेड्स कमी करत नाही, तर नाकावरील राब झालेली त्वचा काढून तिला नैसर्गिक तजेला देतो, ज्यामुळे नाक स्वच्छ आणि स्मूथ दिसते. ज्यांची त्वचा अधिक तेलकट आहे, त्यांच्यासाठी बेकिंग सोडा हा ब्लॅकहेड्स काढण्याचा एक जालीम उपाय आहे. बेकिंग सोडा त्वचेचा पीएच संतुलित राखण्यास आणि अतिरिक्त तेल शोषून घेण्यास मदत करतो. १ टेबलस्पून बेकिंग सोड्यात थोडे पाणी मिसळून तयार झालेली पेस्ट नाकावर ५ मिनिटे लावून हलका मसाज करावा. यामुळे छिद्रांमध्ये अडकलेली कडक घाण विरघळते आणि ब्लॅकहेड्स झटपट निघतात. मात्र, हा उपाय केल्यावर चेहरा थंड पाण्याने धुवावा जेणेकरून उघडलेली छिद्रे पुन्हा बंद होतील. मुलतानी माती त्वचेतील जास्तीचे तेल शोषून घेण्यासाठी आणि छिद्रांना आतून स्वच्छ करण्यासाठी जगप्रसिद्ध आहे. २ टेबलस्पून मुलतानी मातीत गुलाबपाणी मिसळून तयार केलेला मास्क नाकावर लावल्यास तो सुकताना त्वचेतील ब्लॅकहेड्सना ओढून काढतो. हा मास्क संपूर्ण चेहऱ्यावर लावल्यास त्वचेचा रंग उजळतो आणि पोअर्स टाइट होतात. गुलाबपाण्यामुळे त्वचेला थंडावा मिळतो आणि मुलतानी मातीमुळे त्वचा खोलवर स्वच्छ होऊन भविष्यात ब्लॅकहेड्स होण्याची शक्यता कमी होते.

### केसांवर कंगवा फिरवताच पुंजके फरशीवर पडतात? एकदा केसांवर लावा केस गळणं थांबेल



केसांचे आरोग्य हे त्यांच्यातील ओलावा आणि पोषणावर अवलंबून असते. जेव्हा केस कोरडे आणि निर्जीव होतात, तेव्हा त्यांच्यामध्ये वारंवार गुंता होतो. विंचरताना हा गुंता सोडवताना केसांवर ताण पडतो आणि ते मुळांपासून किंवा मधूनच तुटतात. थंडीच्या दिवसांत कोरड्या हवेमुळे केसांचा नैसर्गिक ओलावा निघून जातो, ज्यामुळे केस 'फ्रिजी' आणि विस्कटलेले दिसू लागतात. जर या समस्येकडे दुर्लक्ष केले तर केस गळतीचे प्रमाण वाढून टक्कल पडण्याची भीती निर्माण होते. बाजारात मिळणारे केमिकल्युक्त कंडिशनर्स किंवा हेअर मास्क तात्पुरती चमक देतात, पण ते केसांच्या अंतर्गत रचनेला हानी पोहोचवू शकतात.

अशावेळी स्वयंपाकघरातील नैसर्गिक घटकांपासून तयार केलेला हेअर पॅक केसांसाठी अमृतासारखे काम करतो. केळी आणि मध यांसारख्या पदार्थांमध्ये केसांचे खोलवर पोषण करण्याची क्षमता असते. हा केमिकल-फ्री हेअर पॅक केवळ केसांचा गुंता कमी करत नाही, तर त्यांना नैसर्गिक चमक आणि मजबूती प्रदान करतो. घरगुती उपायांचा सातत्याने वापर केल्यास केसांचा पोत सुधारतो आणि केस विंचरताना तुटण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटते. केसांचा कोरडेपणा दूर करण्यासाठी पिकलेले केळी आणि मध यांचे मिश्रण अत्यंत प्रभावी ठरते. केळीमध्ये पोटॅशियम, नैसर्गिक तेले आणि जीवनसत्त्वे असतात जी केसांची लवचिकता सुधारतात, तर मध हा एक नैसर्गिक 'ह्युमेक्टंट' (ओलावा टिकवणारा घटक) आहे. हा पॅक बनवण्यासाठी एक पिकलेले केळी बारीक करून त्यात एक मोठा चमचा मध मिसळावा. हे मिश्रण केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत लावल्याने केसांना नैसर्गिक प्रथिने मिळतात आणि त्यांचा फ्रिजीनेस कमी होऊन ते मऊ होतात.हा हेअर पॅक लावल्यानंतर केसांच्या मुळांना हलक्या हाताने मसाज करावा, ज्यामुळे रक्ताभिसरण सुधारते. हा पॅक केसांवर किमान अर्धा तास तसाच राहू द्यावा. त्यानंतर केस धुण्यासाठी 'माईल्ड' किंवा सल्फेट-मुक्त शाम्पूचा वापर करावा. केस धुताना कोमट पाण्याचा वापर करणे श्रेयस्कर ठरते, कारण ते केसांमधील नैसर्गिक ओलावा टिकवून ठेवते. आठवड्यातून एकदा हा उपाय केल्यास केसांमध्ये स्पष्टपणे सकारात्मक बदल दिसून येतात.

# 'ते आणि मी 'बिग बॉस'च्या घरात कधीच एकत्र आलो नसतो...',

## वडिलांबद्दल बोलताना रितेश भावुक, निशिकांत कामतबद्दलही भरभरून बोलला

मुंबईः छोट्या पडद्यावरचा वादग्रस्त शो म्हणून ज्या शोची ओळख आहे असा, बिग बॉस मराठी शो लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या शोचा यंदा सहावा सीझन असणार आहे. लाडका सुपरस्टार, आपला 'भाऊ' अर्थात अभिनेता रितेश देशमुख बिग बॉस मराठीचा नवा सीझन घेऊन येत आहे. या नवीन सीझनच्या निमित्तानं दिलेल्या मुलाखतीत रितेशनं अनेक विषयांवर गप्पा मारल्या. 'मुंबई टाइम्स' ला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यानं खास गोष्टीही शेअर केल्याचं पाहायला मिळालं.

या मुलाखतीत रितेशला 'तू 'बिग बॉस'च्या घरात काही दिग्गज व्यक्तींसोबत गेलास तर त्यांना काय विचारशील, त्यांच्याशी काय बोलशील? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर त्यानं त्याच्या खास शैलीत दिलेलं उत्तर चर्चेत आलंय. विशेष म्हणजे दिवंगत वडिलांचं नाव ऐकल्यानंतर तो भावुक झाल्याचंही पाहायला मिळालं.

विलासराव देशमुख यांच्यासोबत बिग बॉसच्या घरात गेलास तर त्यांना काय विचारशील या प्रश्नावर रितेश म्हणाला की, 'ते आणि मी 'बिग बॉस'च्या घरात कधीच एकत्र आलो नसतो. आमच्या घरातच त्यांच्याशी संवाद साधला असता.

तर दिवंगत मित्र निशिकांत कामतबद्दल बोलतानाही रितेश भावुक झाला. 'मी बिग बॉसच्या घरात त्यांच्यासोबत चहा पित निवांत गप्पा माराव्यात असं वाटतं. ते माझे खूप जवळचे मित्र होते. आमचं जवळपास दोन दिवसाआड बोलणं व्हायचंच. ती भेट खासगी असावी असं मला वाटतं. असं त्यानं म्हटलं.



## मराठी अभिनेत्रीशी लग्न केल्यावर न चुकता मंदिरात जातो भारतीय मुस्लिम क्रिकेटपटू,

### लग्नासाठी घरच्यांना पटवणं होतं टास्क

जेव्हा झहीर खान सागरिकाच्या वडिलांना एक तास भेटला होता, तो म्हणाला, "आम्ही दोघेही एकमेकांच्या कुटुंबांचा खूप आदर करतो. तिच्या आईला तिच्या वडिलांच्या आधी आमच्याबद्दल माहिती होती. तिने आम्हाला खूप मदत केली. जेव्हा मी पहिल्यांदा सागरिकाच्या वडिलांना भेटलो तेव्हा मला वाटले होते की ही 15-20 मिनिटांची भेट असेल, जिथे मी त्यांना भेटेन आणि नंतर निघून जाईन. पण ती भेट तीन तास चालली. आम्ही त्या तीन तासांत सामान्य गोष्टींबद्दल बोललो तरी मला आश्चर्य वाटले."जेव्हा झहीर खान सागरिकाच्या वडिलांना एक तास भेटला होता, तो म्हणाला, "आम्ही दोघेही एकमेकांच्या कुटुंबांचा खूप आदर करतो. तिच्या आईला तिच्या वडिलांच्या आधी आमच्याबद्दल माहिती होती. तिने आम्हाला खूप मदत केली. जेव्हा मी पहिल्यांदा सागरिकाच्या वडिलांना भेटलो तेव्हा मला वाटले होते की ही 15-20 मिनिटांची भेट असेल, जिथे मी त्यांना भेटेन आणि नंतर निघून जाईन. पण ती भेट तीन तास चालली. आम्ही त्या तीन तासांत सामान्य गोष्टींबद्दल बोललो तरी मला आश्चर्य वाटले."सागरिका म्हणाली होती, "जेव्हा मी पहिल्यांदा झहीरच्या कुटुंबाला भेटले तेव्हा मी निश्चितच खूप घाबरले होते. आम्ही दोघांनीही एकमेकांचे विचार समजून घेतले होते, म्हणून आम्ही सर्वकाही साधे ठेवण्याचा निर्णय घेतला. आम्हाला आमच्या पालकांनी आमच्या आनंदात सहभागी व्हावे आणि आमच्या निर्णयाचे कौतुक करावे अशी आमची इच्छा होती. म्हणून, त्यांनी असेही म्हटले होते की, 'तुम्हाला जे काही करायचे आहे ते करा, आमचे आशीर्वाद तुमच्यासोबत आहेत.'



## नीना गुप्ता यांची होणाऱ्या नवऱ्याने केलेली फसवणूक, साखरपुड्यानंतर मोडलं लग्न अन्...

मुंबई - सुप्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री नीना गुप्ता पप्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतात. अभिनेत्रीनं अलीकडेच तिच्या आयुष्यातील अनेक मोठी रहस्ये उघड केली. नीना गुप्ता यांनी खुलासा केला की, १९८० च्या दशकात त्यांचं लग्न मोडलेलं. अभिनेत्रीसाठी ही कठीण परिस्थिती होती, पण तिनं हार मानली नाही. समाजाचे टोमणे सहन करूनही, नीना गुप्ता यांनी स्वतःला सिद्ध केलं.

नीना गुप्ता यांनी 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांच्या लग्नाबद्दल सांगितलं. मुलाखतीदरम्यान नीना म्हणाल्या की, 'माझा साखरपुडा अशा मुलासोबत झालेला, जो शेवटच्या क्षणी मला सोडून गेला. माझ्या मनात फक्त एवढाच विचार होता की, साखरपुडा झाला आहे. लग्नानंतर मला मूल होईल. मी कपडे आणि दागिने खरेदी करण्यासाठी दिल्लीला गेले होते, तेव्हा त्याने फोन केला आणि सांगितलं की, हे लग्न होणार नाही. मी विचारलं की, काय झालं? त्यावर त्यानं सांगितलं की, त्याला सायनस सर्जरी करायची आहे.'

'माझं लग्न अचानक तुटल्यानं मला धक्का बसला. माझं कुटुंब किंवा माझा होणारा नवरा दोघेही मला काहीही सांगत नव्हते. वारंवार चौकशी करूनही मला कारण कळलं नाही. याचा माझ्या आयुष्यातील निर्णयांवर परिणाम झाला आणि मला एकटीला पुढे जाण्याचं धाडस मिळालं. साखरपुडा झाल्यानंतर सहा महिन्यांनी, तोच मुलगा लग्नासाठी विचारायला आलेला. मी त्याला सांगितलं की, मी आता त्याच्याशी लग्न करणार नाही, मी त्याला म्हटलं, तू इथून निघून जा.' असं नीना यांनी पुढे सांगितलं.



लग्न मोडल्यानंतर, नीना क्रिकेटपटू विवियन रिचड्‌र्स यांच्यासोबत रिलेशनशिपमध्ये होत्या. विवियन यांच्यापासून नीना यांना एक मुलगी आहे. समजाच्या अपेक्षांना झुगारून, नीना यांनी मसाबाला एकटीनं वाढवलं. २००८ मध्ये, नीना यांनी विवेक मेहरा यांच्यासोबत लग्न केलं. आज, त्या आनंदाने जगत असून अनेक महिलांसाठी एक उदाहरण बनल्या आहेत.

## अतुल कुलकर्णी नव्हे तर आदेश बांदेकर होते 'नटरंग'साठी पहिली पसंती




मराठी चित्रपट विश्वामध्ये अजरामर सिनेमांच्या यादीमध्ये 'नटरंग' या रवी जाधव दिग्दर्शित सिनेमाचं नाव अग्रक्रमाने घेतलं जातं. अतुल कुलकर्णी, सोनाली कुलकर्णी, किशोर कदम, प्रिया बेर्डे, विभावरी देशपांडे अशा अनेक दिग्गज कलाकारांच्या अभिनयाने नटलेला सिनेमा प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेणारा ठरला. अमृता खानविलकर आणि सोनालीचे लावणी सादरीकरण आजही प्रेक्षकांच्या काळजात घर करुन जातं. लावणी परंपरा म्हटलं की, या चित्रपटातील गाणी, प्रसंग अन् संवाद डोळ्यासमोर उभे राहतात. शिवाय गुणवंतराव उर्फ गुणा कागलकर हे पात्र अतुल कुलकर्णींच्या सर्वोत्तम पात्रांपैकी एक आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मात्र, तुम्हाला माहीत आहे का, या भूमिकेसाठी अतुल दिग्दर्शकाची पहिली पसंती नव्हता?

'नटरंग'मध्ये अतुलने साकारलेली 'गुणा'ची भूमिका आव्हानात्मक होती. अनेकदा असेही म्हटले जाते की, अतुलच ही भूमिका निभावू शकला, अन्य कोणाला जमलीच नसती. याच कास्टिंगविषयी रवी जाधव यांनी भाष्य केले. त्यांनी म्हटले की, 'गुणा'च्या भूमिकेसाठी अतुल नव्हे तर आदेश बांदेकर यांना घ्यायचा त्यांचा विचार होता. अमोल परचुरेंच्या कॅच अप या मराठी पॉडकास्टमध्ये बोलताना त्यांनी याविषयी प्रतिक्रिया दिली.

## मराठीतला चॉकलेट बॉय, अन् बॉलिवूडमधलं मराठमोळं खणखणीत नाणं गाजवणार

मराठी टेलिव्हिजन मधला सर्वात बहुचर्चित रियालिटी शो बिग बॉस सीझन 6 लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. गेले काही दिवस या शोचे प्रोमो तुफान व्हायरल होत आहेत. यावर्षी सुद्धा प्रसिद्ध अभिनेता रितेश देशमुख हा सूत्रसंचालनाची धुरा सांभाळणार आहे. त्यामुळे यंदाच्या सीझनमध्ये कोणते कलाकार, सोशल मीडिया इन्फ्लुएंसर किंवा राजकीय मंडळी या घरात स्पर्धक म्हणून सहभागी होतात हे पाहणे प्रेक्षकांसाठी उत्साहवर्धक आहे.

अनेक जण वेगवेगळे अंदाज लावत असताना आता आणखी एक मोठे नाव समोर येतेये. यंदाच्या Bigg Boss 6 मध्ये बॉलीवूड पासून, मराठी इंडस्ट्री गाजवणारा तसेच साउथ कलाकारांना आपला आवाज देऊन त्यांनाही लोकप्रिय करणारा मराठमोळा अभिनेता श्रेयस तळपदे बिग बॉस मध्ये स्पर्धा म्हणून सहभागी होणार असल्याचे म्हटले जात आहे. पिंकव्हिलाने त्यांच्या अकाउंट वर एक्सक्लुझिव्ह बातमी म्हणून श्रेयस तळपदे बिग बॉस मध्ये स्पर्धा म्हणून सहभागी होणार असल्याचं म्हटलं आहे. मात्र मेकर्स कडून अजून याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. किंवा श्रेयस तळपदेच्या टीम कडूनही कोणतीही अधिकृत वक्तव्य जारी केलेले नाही.



पिंकविलाच्या या पोस्टवर अनेक जण कमेंट सेक्शन मध्ये श्रेयस साठी उत्सुकता दाखवत आहेत. तर काहींचे म्हणणे आहे की श्रेयस बिग बॉस मध्ये जाऊ शकत नाही... यापैकी काय खरे काय खोटे हे येत्या 11 जानेवारी 2026 रोजीच उघड होईल.

श्रेयस तळपदे च्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास त्याने शाहरुख खान सोबत ओम शांती ओम मध्ये काम केले होते. याशिवाय त्याचे गोलमाल रिटर्न्स, वेलकम टू सज्जनपूर, गोलमाल 3, हाउसफुल 2, गोलमाल अगेन यांसारख्या बॉलिवूड सिनेमांमध्ये त्याने आपली छाप पाडली आहे.

# नागराजचा साळसूदपणाचा मुखवटा उतरवलाच!

## सुमन काकूच्या किडनॅपिंगमागे काकाचाच हात अर्जुनची थेट पोलीस तक्रार

ठरलं तर मग या मालिकेच्या आजच्या 8 January 2026 च्या एपिसोडमध्ये सायली अर्जुन कडे सुमन बद्दल चिंता व्यक्त करते. सुमन काकू आपल्या घरी यायला निघालेल्या पण त्या अजूनही पोहोचल्या नाहीत. शिवाय त्यांच्या घरालाही लॉक आहे. मगाशी त्यांनी मला फोन केलेला तेव्हा त्या रिक्षेत होत्या मग आता त्या गेल्या कुठे? त्यानंतर सायली, अर्जुन, आणि चैतन्य तिघे मिळून सुमनची शोधाशोध करतात. मात्र कोणीच तिला कुठेही पाहिलेलं नसतं. त्यानंतर त्यात तिघांना सुमन किडनॅप झाली असल्याचा संशय येतो.

सुभेदारांच्या घरात खेळ चालू असतात. एकाने एक्टिंग करून दाखवायची आणि समोरच्याने तो कोणता अभिनेता किंवा अभिनेत्री आहे हे ओळखायचं या खेळामध्ये रंगत आलेली असते. विशेष म्हणजे नागराज आणि प्रिया सुद्धा घरी येऊन त्यांना जॉईन झालेले असतात. घरात सगळे आहेत पण सायली अर्जुन नाही त्यामुळे कल्पना फोन करून त्यांची चौकशी करते. घरचे सगळे चिंता करतील त्यामुळे ते तिघं घरी निघतात. घरी आल्यावर पाहतात तर काय नागराज घरी असतो. त्यामुळे त्यांना आश्चर्यचकित व्हायला होतं. जर नागराज काका इथे आहेत ना सुमन काकू कुठे आहेत?

सायली अर्जुन यायच्या आधी नागराजने मुद्दाम सुमनची चौकशी केलेली असते. तेव्हा प्रतिमा त्याला म्हणते की ती आमच्यासोबत येत होती पण तिला काही काम आठवलं त्यामुळे ती थोड्यावेळाने येणार आहे. जेव्हा सायली अर्जुन घरी येतात तेव्हा ती दोघं प्रायव्हसीसाठी बाहेर गेलेले असे म्हणून सगळे त्यांना चिडवतात. सायलीचा चेहरा उतरला असल्याचं घरात सगळ्यांना लक्षात येतं. नागराजला समोर पाहून त्या तिघांनाही राग येतो. तिघंही पुन्हा बाहेर जातात त्यामुळे घरात सगळ्यांना चिंता वाटते की या तिघांचं नक्की काय चालू आहे.

बाहेर जाऊन सायली बोलते की मला खूप वाटतंय...

सुमन काकू गायब होण्यामागे नागराज काकांचा हात आहे. आपण त्यांची पोलीस तक्रार करूया. चैतन्य तिला समजावतो की असा आपल्याला करता येणार नाही कारण एखादी व्यक्ती गायब होऊन 24 तास झाले असतील तरच पोलीस तक्रार करता येते. त्यानंतर अर्जुन स्वतःहून पोलिसांना फोन करून सांगतो की माझी काकू सुमन किल्लेदार केल्या काही तासांपासून गायब आहे. मला त्या पाठी माझा काका नागराज किल्लेदार असल्याचा संशय आहे. गेले काही दिवस तो तिला मारहाण करत होता. आम्ही तिच्या पाठीवर मारहाणीच्या खुणा पाहिल्या होत्या. मी हे तुम्हाला अन ऑफिशियल सांगत आहे.



## अर्थविश्व...

### 2025 च्या अर्थसंकल्पाने ज्येष्ठ नागरिकांना दिला होता मोठा दिलासा, 2026 मध्ये सरकार देणार बंपर भेट?



मुंबई: 2025 च्या केंद्रीय अर्थसंकल्पाने वृद्ध आणि पेन्शनधारकांच्या चेहऱ्यावर समाधान होते. सरकारने मागील Budget कर नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले, ज्यामुळे निवृत्तीनंतरच्या उत्पन्नात लक्षणीय दिलासा मिळाला. मुदत ठेवींवरील व्याजापासून ते घरभाड्यापर्यंत, ज्येष्ठ नागरिकांना पूर्वीपेक्षा जास्त पैसे वाचवण्याची क्षमता आहे. आर्थिक विश्लेषकांचा असा विश्वास आहे की या बदलांमुळे वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षितता आणखी मजबूत होईल. Senior Citizen सर्वात मोठा दिलासा टीडीएस मर्यादेत वाढ झाल्यामुळे आला आहे. आता, दरवर्षी ₹ लाखांपर्यंतच्या बँक एफडीवर मिळणारे व्याज करमुक्त असेल. पूर्वी, ही मर्यादा फक्त ₹50,000 होती. यामुळे त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी व्याजावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना मोठा फायदा होईल. त्यांना आता कर परताव्यासाठी जास्त वेळ वाट पाहावी लागणार नाही. तसेच, भाड्याच्या उत्पन्नावरील टीडीएस मर्यादा ₹.40 लाखांवरून 6 लाख वार्षिक करण्यात आली आहे. यामुळे ज्या घरमालकांच्या उत्पन्नाचा प्राथमिक स्त्रोत भाडे आहे त्यांना फायदा होईल. त्यांच्याकडे आता दरमहा अधिक रोख रक्कम उपलब्ध असेल, ज्यामुळे त्यांना त्यांचे वैद्यकीय आणि इतर खर्च सहजपणे पूर्ण करता येतील. सरकारने नवीन कर प्रणाली अधिक आकर्षक केली आहे. 12 लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना आता कोणताही कर भरण्यापासून सूट मिळेल. मूळ सूट मर्यादा देखील 4 लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे. उदाहरणार्थ, जर एखाद्या वृद्ध व्यक्तीने बँकेच्या एफडीमध्ये 3 लाख रुपये गुंतवले आणि 7.5% व्याज मिळवले तर ते कोणत्याही टीडीएस कपातीशिवाय दरवर्षी 75,000 पर्यंत सहज कमावू शकतात. 2025च्या अर्थसंकल्पात अनेक सवलती देण्यात आल्या असताना, सर्वांचे लक्ष आता 2026 च्या अर्थसंकल्पावर आहे. पेन्शनधारकांना जुन्या कर प्रणाली अंतर्गत सूट मर्यादेत वाढ होण्याची अपेक्षा आहे, जी गेल्या दोन वर्षांपासून अपरिवर्तित आहे. 75 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी आयकर रिटर्न भरण्याची वयोमर्यादा 70 वर्षे करण्याची मागणी देखील होत आहे.

### यंदा बजेट कधी सादर होईल, रविवारी की सोमवारी? 1 फेब्रुवारीचा सस्पेन्स संपला




आर्थिक वर्ष 2026-27 साठी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या तारखेविषयी लोकांमध्ये कन्फ्युजन दिसत होते. या वर्षी 1 फेब्रुवारी ही तारीख रविवारी पडत असल्यामुळे यंदा सर्वसाधारण बजेट रविवारी सादर होणार का की इतर दिवशी संसदेत सादर केला जाणार याबाबत संभ्रम पाहायला मिळत होतं. पण अखेरीस सरकारने याविषयीचा सस्पेन्स संपला असून अर्थसंकल्पाची तारीख जाहीर झाली आहे.

2026 चा अर्थसंकल्प कधी सादर होणार?

2026-27 या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प 1 फेब्रुवारी रोजी लोकसभेत सादर केला जाणार आहे, तर त्यापूर्वी 29 जानेवारी रोजी आर्थिक सर्वेक्षण सादर केले जाईल. अर्थमंत्री निर्मला सीतारामन नवव्यांदा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करून इतिहास रचणार आहेत. विशेष म्हणजे, केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी सादर होण्याची ही दुसरी वेळ असेल. याआधी 28 फेब्रुवारी 1999 रोजी तत्कालीन अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी 1999-2000 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला होता.संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संसदीय कामकाज विषयक मंत्रिमंडळ समितीने (CCPA) संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तारखांना मान्यता दिली आहे. राष्ट्रपती 28 जानेवारी रोजी संसदेच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील आणि यासह अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात होईल. न्यूज18 ने सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की आर्थिक सर्वेक्षण 29 जानेवारी रोजी संसदेत सादर केले जाईल. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा 28 जानेवारी ते 13 फेब्रुवारी दरम्यान चालेल, तर दुसरा टप्पा 9 मार्च ते 2 एप्रिल दरम्यान चालेल. अर्थमंत्री निर्मला सीतारमणन सलग नवव्यांदा आणि स्वातंत्र्यानंतरचा 88 वा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अर्थसंकल्पासह, निर्मला सीतारमन सलग नऊ अर्थसंकल्प सादर करणाऱ्या पहिल्या अर्थमंत्री बनतील आणि यासह देशात सर्वात जास्त काळ अर्थसंकल्प सादर करणाऱ्या अर्थमंत्र्यांच्या यादीत त्यांचे स्थान आणखी मजबूत होईल. माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी दोन कार्यकाळात एकूण 10 अर्थसंकल्प सादर केलेले, तर पी. चिदंबरम आणि प्रणव मुखर्जी आहेत, ज्यांनी आठ अर्थसंकल्प सादर केले.

2017 पासून सरकारने 1 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता अर्थसंकल्प सादर करण्याची सुरु केली. याआधी 28 फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर करण्याची परंपरा होती. नवीन आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला अर्थसंकल्पीय प्रस्तावांची लवकर अंमलबजावणी करता यावी यासाठी माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या कार्यकाळात हा बदल करण्यात आला होता, पण आठवड्याच्या शेवटी अर्थसंकल्प सादर करणे नवीन नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी गेल्या वर्षी 2025 चा अर्थसंकल्प शनिवारी सादर केला होता आणि माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी 2015 व 2016 चा अर्थसंकल्प 28 फेब्रुवारी रोजी, दोन्ही शनिवारी, सादर केला.

# वैभव सूर्यवंशीचा ऐतिहासिक पराक्रम

## वयाच्या 14व्या वर्षी सहा देशांविरुद्ध शतके झळकावणारा जगातील पहिला फलंदाज

नवी दिल्ली : वैभव सूर्यवंशीने धमाकेदार फटकेबाजीच्या जोरावर आता एक मोठा वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. वैभव हा अशी कामगिरी करणारा जगातील पहिलाच खेळाडू ठरला आहे.

वैभव सूर्यवंशीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात फक्त १९ चेंडूंत ९६ धावा फटकावल्या होत्या. वैभव या सामन्यात अशी धडाकेबाज फटकेबाजी करत होता की, त्याच्यापुढे दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना लोटांगण घालावं लागलं. वैभवने सुरुवातीपासूनच या सामन्यात जोरदार फटकेबाजी करायला सुरुवात केली. पहिल्या षटकापासून वैभव गोलंदाजांवर तुटून पडला आणि त्याने त्यांच्या तोंडचे पाणी पळवले होते. वैभव या सामन्यात ७४ चेंडू खेळला आणि १७१ च्या स्ट्राईक रेटने त्याने १० षटकार आणि ९ चौकारांच्या जोरावर १२८ धावांची दणकेबाज खेळी साकारली. वैभवच्या दमदार शतकाच्या जोरावर भारताला या सामन्यात ३९३ धावांचा डोंगर उभारता आला होता. भारताने त्यानंतर दक्षिण आफ्रिकेला फक्त १६० धावांत रोखले होते आणि दक्षिण आफ्रिकेवर २२३ धावांनी सर्वात मोठा विजय साकारला होत. या शतकानंतर वैभवच्या नावावर एक वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवला गेला, जो आतापर्यंत कोणालाही रचता आलेला नाही.

वैभवचे हे शतक त्याच्यासाठी सर्वत महत्वाचे ठरले. कारण या शतकामुळेच त्याला असा वर्ल्ड रेकॉर्ड करता आला, जो आतापर्यंत कोणालाही जमला नाही. वैभवचे हे आंतरराष्ट्रीय स्तरावर सहा देशांविरुद्धचे शतक ठरले आहे. वैभवने आता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शतक झळकावलं, पण त्यापूर्वी त्याने ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, श्रीलंका, कतार, युएई या देशांविरोधात शतक झळकावले आहे. वयाच्या १४ व्य वर्षी सहा देशांमध्ये शतक झळकावणारा वैभव हा जगातला पहिलाच खेळाडू ठरला आहे. कारण आतापर्यंत जगभरात १४ व्या वर्षी एकाही खेळाडूला सहा देशांच्या विरोधात शतक करता आलेले नाही. त्यामुळे वैभवच्या नावावर हा वर्ल्ड रेकॉर्ड जमा झाला आहे.

वैभवच्या शिरपेचात आता अजून एक मानाचा तुवा खोवला गेला आहे. वैभवने जो वर्ल्ड रेकॉर्ड रचला आहे, तो आतापर्यंत जगात कोणालाही जमला नसल्याचे समोर आले आहे.




## बांगलादेशमधील हिंदूवरील भ्याड हल्ल्यांवर शिखर धवन भडकला

नवी दिल्ली : बांगलादेशमध्ये निष्पाप हिंदूवर भ्याड हल्ले केले जात आहेत. बांगलादेशमध्ये हिंदूंवर होणारे अत्याचार हे संपूर्ण जग पाहत आहे. आतापर्यंत एकाही क्रिकेटपटूने बांगलादेशबाबत विधान केले नव्हते. पण भारताचा माजी सलामीवीर शिखर धवन आता बांगलादेशमध्ये होणाऱ्या हिंदूवरील हल्ल्यावर भडकला आहे.

बांगलादेशमध्ये अस्थिर वातावरण आहे. बांगलादेशमधील लोकं हिंदू धर्मियांवर प्राणघातच हल्ले करत आहेत, ज्यामध्ये काही हिंदूना जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंना भारतात प्रवेश देऊ नये, अशी भारतीयांची भावना होती. पण सुरुवातीला बीसीसीआयने ही गोष्ट मान्य केली नाही. पण भारतीयांचा राग जसा वाढला, तसे बीसीसीआयला नमते घ्यावे लागले. बीसीसीआयने भारताचा बांगलादेशचा जाहीर केलेला दौरा स्थगित केला. त्याचबरोबर आयपीएलमधून बांगलादेशच्या मिस्ताफिझूर रेहमानला बाहेरचा रस्ता दाखवला. बांगलादेशने त्यानंतर आपण भारतात टी २० वर्ल्ड कप खेळमार नसल्याची धमकी आयसीसीला दिली. पण आयसीसीने त्याला भीक घातली नाही. क्रिकेटबबात बऱ्याच घडामोडी घडत असताना एकही क्रिकेटपटू याबाबत कधीच बोलला नव्हता, पण आता शिखर धवनने मात्र आपले मौन सोडले आहे. शिखर धवन म्हणाला की, " बांगलादेशमध्ये एका हिंदू विधवावर क्रुरपणे जो अमानुष अत्याचार झाला, हे वाचून वाईट वाटलं. कोणत्याही व्यक्तीबरोबर अशी हिंसा कधीच होऊ नये, असे मला वाटते. या गोष्टीचा स्विकार कधीच होऊ शकत नाही. जी पिडीत व्यक्ती आहे तिला न्याय मिळायला हवा, असे मला वाटते. त्यासाठी मी प्रार्थना करतो. या घटना बांगलादेशमधील जे अल्पसंख्याक हिंदू आहेत, त्यांच्यासुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे, याचाही विचार करायला हवा. "



# भारतात टी 20 वर्ल्ड कप खेळणारच नाही, पण...

### बांगलादेशचा मोठा निर्णय, आयसीसीच्या नकारानंतर आली मोठी अपडेट

नवी दिल्ली : भारताला मोठा धक्का देण्यासाठी बांगलादेशने टी २० वर्ल्ड कपचा आधार घेतला. आपले टी २० वर्ल्ड कपचे सामने भारतात खेळणार नसल्याचे त्यांनी सांगितले होते. पण आयसीसीने त्यांची मागणी नाकारली होती. पण त्यानंतर आता बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाने एक मोठा निर्णय घेतला आहे. आम्ही भारतात तर क्रिकेट खेळणारच नाही, पण त्याचबरोबर अजून एक गोष्ट करू शकतो, हे त्यांनी आता सांगितले असून ही नवीन अपडेट आता समोर आली आहे.



बांगालेदशमध्ये निष्पाप हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत, प्राणघातक हल्ले होत आहेत. हे सर्व संपूर्ण जग पाहत आहे. हिंदूवर केलेल्या हल्ल्यांत काही जणांना मृत्यूही झाला आहे. त्यामुळे भारतामध्ये बांगलादेशबाबत राग उफाळला आहे. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंना भारतात पाय ठेवायला देणार नाही, अशी भावना भारतीयांच्या मनात आहे. त्यामुळेच बीसीसीआयने नमते घेतले आणि बांगलादेशच्या मिस्ताफिझूर रेहमानला आयपीएलमधून बाहेर केले. या गोष्टीचा राग बांगलादेशच्या क्रिकेटट मंडळाला आला. त्यानंतर बांगलादेशने आपल्याला भारतात सुरक्षित वाटत नाही. त्यामुळे आम्ही भारतात वर्ल्ड कपचे सामने खेळणार नाही, असे म्हटले होते. ही मागणी त्यांनी आयसीसीकडे केली. आयसीसीने ही मागणी नाकारली. त्यानंतर आता बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाने एक मोठा निर्णय घेतला आहे. बां बांगलादेशने कडवटणे आपली भूमिका आता व्यक्त केली आहे. आपण भारतात खेळणारच नाही, पण अजून कुठे खेळू शकतो, हे आता बांगलादेश क्रिकेट संघटनेच्या संचालकांनी स्पष्ट केले आहे.

गलादेशच्या क्रिकेट मंडळाच्या संचालक आसिफ अकबर यांनी म्हटले आहे की, " आम्ही आमचा निर्णय स्पष्टपणे घेतलेला आहे. आम्ही कोणत्याही दुसऱ्या पर्यायाचा विचारच करत नाही. मिस्ताफिझूर रेहमानच्या प्रकरणानंतर बांगलादेशच्या संघाला भारतामध्ये सुरक्षित वाटत नाही. जर खेळाडूंना सुरक्षित वाटत नसेल तर आम्ही भारतात वर्ल्ड कपचे सामने का खेळायचे. त्यामुळे सर्व गोष्टींचा साराराव विचार करून आम्ही निर्णय घेतला आहे की, आम्ही टी २० वर्ल्ड कपचे सामने भारतात खेळणारच नाही. त्यामुळे आमचे सामने श्रीलंकेत खेळवावेत, अशी मागणी आता आम्ही आयसीसीकडे करत आहोत. या आमच्या मागणीवर आम्ही ठाम आहोत. " बांगलादेशने आपण भारतात खेळणारच नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर आता आम्हाला भारतात का खेळायचे नाही, याचे कारणही सांगितले आहे. बांगलादेश जर आपल्या या निर्णयावर कायम राहीली, तर आयसीसीपुढील पेच वाढू शकतो.

# आमच्या देशाचा अपमान आहे...बांगलादेशचा माज काही कमी होत नाही, आता थेट ICC वर केले मोठे आरोप

मुंबई: भारत आणि बांगलादेश यांच्यातील राजकीय संबंध सध्या नाजूक आहेत. India And Bangladesh यांच्यातील राजकीय वातावरण चिघळलेले असताना आता क्रिकेटवरुन नवनवीन वाद रोज रंगताना दिसत आहे. बांगलादेश आता रोज नवनवीन अटी भारतासमोर ठेवत आहे. आता बांगलादेशने आयसीसीसमोर T20 World Cup 2026 वेन्यू बदलण्याची मागणी केली होती. यावर आयसीसीने चोख उत्तर दिले पण आता त्यावर बांगलादेशने पलटवार केला आहे.बांगलादेशचे युवा आणि क्रीडा सल्लागार आसिफ नजरुल यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की ICC बांगलादेशमधील परिस्थिती अद्याप पूर्णपणे समजलेली नाही. आयसीसीकडून मिळालेल्या पत्राचा हवाला देत नजरुल म्हणाले की, "बांगलादेशने उपस्थित केलेल्या गंभीर सुरक्षेच्या चिंता या पत्रातून दिसून येत नाहीत. देशाचा कोणताही अनादर सहन करणार नाहीत."




कोलकाता नाईट रायडर्सने मुस्तफिजूर रहमानला सोडल्यापासून भारत आणि बांगलादेश क्रिकेट बोर्डांमधील परिस्थिती तणावपूर्ण आहे. त्यानंतर काही वेळातच, बांगलादेश क्रिकेट बोर्डाने त्यांच्या संघाचे टी-20 विश्वचषक सामने श्रीलंकेत हलवण्याची मागणी केली. आसिफ नजरुल म्हणाले, "आज आम्हाला मिळालेले आयसीसी पत्र वाचून आम्हाला समजले आहे की त्यांना भारतात बांगलादेशी क्रिकेटपटूंना भेडसावणाऱ्या गंभीर सुरक्षा परिस्थितीची पूर्णपणे कल्पना आलेली नाही. मला वाटते की ही केवळ सुरक्षेची समस्या नाही तर देशाचा अपमान आहे. तरीही, आम्ही याला प्रामुख्याने सुरक्षेचा मुद्दा मानत आहोत."आसिफ नजरुल पुढे म्हणाले की, "बांगलादेशमध्ये क्रिकेटबद्दल प्रचंड आवड आहे आणि संघ निश्चितच विश्वचषकात खेळू इच्छितो. आम्हाला भारतातील सांप्रदायिक परिस्थितीवर चर्चा करायची नाही, परंतु जेव्हा आपल्या क्रिकेटपटूंच्या सुरक्षिततेचा आणि बांगलादेशच्या सन्मानाचा प्रश्न येतो तेव्हा हा प्रश्न उद्भवणे निश्चित आहे. जेव्हा भारतीय क्रिकेट बोर्ड स्वतः कोलकाता नाईट रायडर्सना सांगत आहे की ते या विशिष्ट खेळाडूला सुरक्षा देऊ शकत नाही आणि त्याला वगळण्यास सांगितले आहे, तेव्हा हे दर्शवते की भारतात खेळणे आपल्यासाठी सुरक्षित नाही." आयसीसीने बांगलादेशला भारतात खेळायला जा अन्यथा तुम्हाला गुण गमवावे लागतील, असा इशारा आयसीसीने बांगलादेशसोबत झालेल्या ऑनलाईन बैठकीत झाला.

### बांगलादेशची आयसीसीने लाज काढली...

भारताला धक्का द्यावा, यासाठी बांगलादेशने टी २० वर्ल्ड कपचे कार्ड वापरले होते. पण आता आयसीसीने त्यांनाच धक्का दिला आहे. कारण आयसीसीने बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाबरोबर एक बैठक घेतली होती. या बैठकीत आयसीसीमे बांगलादेशची लाज काढली आहे. भारतात टी २० वर्ल्ड कप खेळण्याबाबत आयसीसीने बांगलादेशला नेमकं काय सांगितलं आहे,'आमच्या खेळाडूंच्या सुरक्षेस भारतात धोका आहे, त्यामुळे आमच्या लढती भारतात नको,' अशी बांगलादेश क्रिकेट बोर्डाची मागणी होती. मात्र, आयसीसीला हे मान्य नाही. त्यांनी हेच बांगलादेशला स्पष्ट केले आहे. एकंदरीत पाहता बांगलादेशची सामने हलवण्याची मागणी मान्य करण्याची आयसीसीची सध्या तरी तयारी नाही. आयसीसीकडून पत्र मिळाल्याचा दावा बांगलादेशने केला आहे. त्यात बांगलादेश संघाचा सहभाग निश्चित करण्यासाठी आमच्यासह चर्चेची तयारी दाखवली आहे. स्पर्धेच्या सुरक्षेची योजना तयार करताना बांगलादेशचे प्रश्न विचारात घेतले जातील, असेही आश्वासन दिले असल्याचा दावा केला. 'बांगलादेश क्रिकेट संघाला भारतात धोका असल्याची कोणतीही माहिती आमच्याकडे नाही. भारतात धोका आहे, असे तुम्हाला वाटत असेल तर त्यामध्ये काहीही तथ्य नाही,' असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने ऑनलाईन बैठकीत बांगलादेश क्रिकेट बोर्डास सुनावले असल्याचे समजते. टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील बांगलादेशच्या प्राथमिक गटसाखळीतील तीन लढती कोलकाता येथे, तर एक मुंबईत आहे. पाकिस्तानचा अपदावद वगळताा कोणत्याही देशाला भारतात असुरक्षित वाटत नव्हते, आता त्यामध्ये बांगलादेश आला आहे. पण बांगलादेशला भारताशी पंगा घेऊन काहीच हाती लागणार नाही, झाले तर नुकसानच होणार आहे. त्यामुळे बांगलादेशने भारतात टी २० वर्ल्ड कपचे सामने खेळले तर ते त्यांच्यासाठी चांगले असेल, अन्यथा मोक्याच्या क्षणी भारतही त्यांना अडचणीत आणू शकतो.



# महासंग्राम



## महत्त्वाचे...

### राज ठाकरे वैफल्यग्रस्त झालेत:सत्तेसाठी कोणत्या थराला चालले...



मुंबई - महापालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे बंधू आणि शिंदे-फडणवीस सरकार यांच्यातील राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाला असून, 'दै. सामना'साठी दिलेल्या ठाकरे बंधूंच्या संयुक्त मुलाखतीतून शिवसेना शिंदे गट आणि भाजपवर जोरदार टीका करण्यात आली. याच पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटात गेलेले नेते प्रकाश महाजन यांनी थेट राज ठाकरेंवर बोचरी टीका केली आहे.राज ठाकरे वैफल्यग्रस्त झाले आहेत. कुठल्याही परिस्थितीत सत्ता मिळवायची, सत्तेसाठी चावडी केली. सत्तेसाठी कोणत्या थराला चालले आहेत, हिंदुत्व कुठे आहे? चंदू मामा कुठे आणि रशीद मामूला त्यांनी जवळ केले, अशा शब्दात प्रकाश महाजन यांनी राज ठाकरेंवर बोचरी टीका केली. पुढे बोलताना प्रकाश महाजन यांनी संजय राऊत तसेच अभिनेते महेश मांजरेकर यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. ते म्हणाले, राज्यात तीन वर्षांपूर्वी एक मुलाखत झाली, त्याचा हा सिक्वल आहे. त्या मुलाखतीत राज ठाकरे सहज नव्हते, चित्रपट सृष्टीतील कोणी नसेल तर एका संपादकाला मुलाखत दिली, असे म्हणत त्यांनी राऊतांवर टीका केली. तसेच महेश मांजरेकर यांना कशाची भीती? त्यांचे मित्र अन्डरवर्ल्डचे आहेत, असा टोला महाजन यांनी लगावला आहे.

### ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो:तर महापाप करणारा महापौर

मुंबई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. नागपूर येथे गेले असताना एका मुलाखतीत त्यांना त्यांच्या नगरसेवकाच्या काळातला किस्सा विचारण्यात आला, यावर फडणवीसांनी एक मजेशीर किस्सा सांगितला. तसेच महापौर आणि नगरसेवकाचा जॉब एकदम टफ असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो आणि ज्याने महापाप केले तो महापौर होतो, असेही फडणवीस यांनी गंमतीने विधान केले. देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी 21 व्या वर्षी नगरसेवक झालो. त्या दिवशी रात्री उशिरापर्यंत मिरवणुका वगैरे काढल्या आणि पहाटे 4 वाजता मी आमच्या घराच्या हॉलमध्ये झोपलो. आणि सकाळी 7 वाजताच घराची बेल वाजली.

# एकनाथ शिंदे आणि संजय राऊत यांची भेट

## मनपा निवडणुकीच्या रणधुमाळीत अनपेक्षित समोरासमोर; राजकीय संघर्षात सौजन्याची झलक

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा जोर शिगेला पोहोचलेला असतानाच, मुंबईच्या राजकीय वर्तुळात गुरुवारी एक अनपेक्षित आणि चर्चेचा विषय ठरलेली घडामोड घडली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे एकाच ठिकाणी समोरासमोर आले आणि त्यांनी एकमेकांशी थेट संवाद साधला. राजकीयदृष्ट्या एकमेकांचे कट्टर विरोधक मानले जाणारे हे दोन्ही नेते सौहार्दपूर्ण वातावरणात भेटल्यामुळे, निवडणूक काळात या प्रसंगाने अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, या भेटीचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.मुंबईतील एका हिंदी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमादरम्यान ही भेट घडली. गुरुवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे या वृत्तवाहिनीला मुलाखत देऊन स्टुडिओबाहेर पडत होते. त्याचवेळी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे याच कार्यक्रमासाठी मुलाखत देण्याकरिता स्टुडिओच्या दिशेने जात होते. स्टुडिओच्या प्रवेशद्वाराजवळ अचानक दोघे समोरासमोर आले. एकमेकांना पाहताच दोघांनीही क्षणभर थांबून अभिवादन केले. यानंतर सुरू झालेली अल्प संवादाची ही भेट अवघ्या काही मिनिटांची असली, तरी तिचे राजकीय पडसाद मात्र मोठ्या प्रमाणात उमटताना दिसत आहेत.

या भेटीत सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्या प्रकृतीची आवर्जून विचारपूस केली. संजय राऊत हे नुकतेच एका गंभीर आजारातून सावरले असून काही काळ ते उपचारासाठी घरीच होते. राऊत आजारी असताना एकनाथ शिंदे यांनी त्यांचे बंधू खासदार सुनील राऊत यांना फोन करून राऊतांच्या तब्येतीबाबत चौकशी केली होती. त्यानंतर गुरुवारी प्रत्यक्षपणे दोघे समोरासमोर आल्यानंतर शिंदे यांनी राऊतांच्या तब्येतीची चौकशी करत आता तब्येत कशी आहे? अशी आपुलकीने विचारणा केली. यावर संजय राऊत यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या तब्येतीची चौकशी केली.

या क्षणिक भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये साधारण एक-दोन मिनिटे जुजबी संवाद झाला. कोणतीही राजकीय चर्चा किंवा निवडणूकविषयक वक्तव्य टाळत, दोघांनीही केवळ वैयक्तिक पातळीवरील विचारपूस आणि औपचारिक बोलणे केले. त्यानंतर दोघेही आपापल्या दिशेने मार्गस्थ झाले. मात्र, या छोटेखानी



भेटीचा क्षण कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्याचे छायाचित्र सध्या सोशल मीडियावर वेगाने पसरत आहे. निवडणूक प्रचाराच्या धामधुमीत घडलेली ही भेट असल्याने, राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडानंतर शिवसेना पक्षात मोठी फूट पडली होती. त्यानंतर निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण हे चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिले, त्यामुळे शिंदे गट अधिकृत शिवसेना ठरला. या घडामोडींनंतर उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यातील राजकीय संघर्ष टोकाला पोहोचला. त्याचा परिणाम म्हणून ठाकरे गटातील नेते, विशेषतः संजय राऊत, सातत्याने एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करत आले आहेत. पत्रकार परिषदांमध्ये, भाषणांमध्ये आणि सोशल मीडियावर राऊत यांची आक्रमक भूमिका कायम दिसून आली आहे.मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार सुरू झाल्यापासून ठाकरे कुटुंबीय आणि ठाकरे गटाने एकनाथ शिंदे यांना थेट लक्ष्य केले आहे. प्रचारसभांमध्ये आणि माध्यमांशी बोलताना शिंदे यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली जात आहे.

# जे घडतंय ते विचारधारेच्या पलीकडचे

## अंबरनाथमधील भाजप-काँग्रेस आघाडीवर एकनाथ शिंदेंचा घरचा आहेर

दिव्य वतन /वृत्तसेवा

'अंबरनाथमध्ये झालेल्या भाजप-काँग्रेस आघाडीबद्दल आम्ही भाजप प्रदेशाध्यक्ष, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोललो होतो. तिथे पाहा काय होतंय ते. जे होतंय, ते विचारसरणेशी सुसुंगत नाही, याची जाण करून दिली होती. हा एकनाथ शिंदे खुर्चीसाठी लढत नाही. सत्ता मिळवण्यासाठी विचारधारेशी तडजोड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही,' असे म्हणत भाजपला घरचा आहेर तर दिलाच, सोबत आरसाही दाखवला. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत 'कोल्ड वॉर' असल्याचा चर्चा होते. यावरही ते मनमोकळेपणाने बोलले.

मुंबईत आजतक वृत्तावाहिनीच्या मुंबई मंथन या कार्यक्रमाच्या मंचावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल



केला. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या निकालांवर भाष्य करताना शिंदे यांनी विरोधकांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. लोकसभा निवडणुकीत जास्त जागा जिंकल्या तेव्हा विरोधकांनी कुठेही धांधलीचा आरोप केला नाही. मात्र, विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर अचानक गैरप्रकारांची भाषा सुरू झाली, असा टोला त्यांनी लगावला. विरोधकांकडे ठोस मुद्दे नसल्यामुळे ते केवळ आरोपांची आणि टीका-टिप्पणीची राजकारण करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

महायुतीतील उमेदवार निवडीवर उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना शिंदे यांनी आत्मविश्वासाने भूमिका मांडली. महायुतीकडे उमेदवारांची मोठी रांग होती, इतकी की अनेक ठिकाणी निवड करताना अडचण निर्माण झाली, असे त्यांनी स्पष्ट केले. याउलट विरोधकांकडे ना विश्वासार्ह मुद्दे आहेत, ना जनतेला सांगण्यासारखा अजेंडा आहे, त्यामुळे ते आरोपांवरच अवलंबून आहेत.

# अंबरनाथमध्ये ऑपरेशन लोटस यशस्वी

## फडणवीसांच्या आदेशानंतर अभद्र युती तुटली...

दिव्य वतन /वृत्तसेवा

अंबरनाथ नगपरिषदेसाठी भाजप आणि काँग्रेसची युती झाली. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजली. ठाकरेंपासून शिंदेपर्यंत साऱ्यांनी भाजपवर आरोप केले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही अभद्र युती तोडण्याचे आदेश दिले. आता या राजकीय नाट्याचा दुसरा प्रसंग रंगला असून, काँग्रेसच्या १२ नगरसेवकांना आता भाजपने प्रवेश दिलाय. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि ज्येष्ठ नेते गणेश नाईक यांच्या उपस्थितीत नवी मुंबईत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

अंबरनाथमध्ये काँग्रेसचे नेतृत्व करणारे प्रदीप नाना पाटील आणि त्यांच्यासह इतर ११ नगरसेवकांनी भाजपला पाठिंबा देण्याचे संकेत दिले होते. याची गंभीर दखल घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन




सपकाळ यांच्या आदेशानुसार वरिष्ठ उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी या सर्व नगरसेवकांना पक्षातून निलंबित केले होते. मात्र, काँग्रेसच्या या कारवाईला जुमानता प्रदीप पाटील यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांसह भाजपमध्ये प्रवेश करून काँग्रेसला मोठा धक्का दिला.

भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नगरसेवकांमध्ये प्रदीप नाना पाटील, दर्शना उमेश पाटील, अर्चना चरण पाटील, हर्षदा पंकज पाटील, तेजस्विनी मिलिंद पाटील, विपुल प्रदीप पाटील, मनीष म्हात्रे, धनलक्ष्मी जयशंकर, संजीवनी राहुल देवडे, दिनेश गायकवाड, किरण बद्रीनाथ राठोड, कबीर नरेश गायकवाड यांचा समावेश आहे.प्रदीप पाटील यांनी अनेक वर्षांपासून अंबरनाथमध्ये काँग्रेसचे संघटन मजबूत ठेवले होते. मात्र, त्यांच्या भाजप प्रवेशामुळे अंबरनाथ नगरपरिषदेत भाजपची ताकद प्रचंड वाढली असून, काँग्रेसचे अस्तित्व संकटात आले आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'काँग्रेससोबत युती करणार नाही' असे स्पष्ट केले होते, मात्र नगरसेवकांनीच भाजपमध्ये प्रवेश केल्याने तांत्रिकदृष्ट्या हा प्रश्न आता संपुष्टात आला आहे.

या घडामोडींवर काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे."जर काँग्रेसने आपल्या नगरसेवकांवर शिस्तभंगाची कारवाई केली, तर ज्या भाजप नेत्यांनी या नगरसेवकांना आघाडीचा प्रस्ताव दिला, त्यांच्यावर भाजपने अद्याप कारवाई का केली नाही?" असा सवाल सचिन सावंत यांनी केला आहे.सचिन सावंत यांनी अकोटमधील भाजप-एमआयएम युतीचा दाखला देत भाजपच्या नीतिमत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "अकोटमध्ये भाजपने सत्तेसाठी एमआयएमशी हातमिळवणी केली. यावरून स्वातंत्र्यपूर्व काळातील हिंदू महासभा आणि मुस्लिम लीगच्या युतीची आठवण होते. भाजप आणि एमआयएम पडद्याआड एकच आहेत, हे आता उघड झाले आहे.

# अमरावती भाजपमध्ये 'ठिणगी':बावनकुळेंच्या उपस्थितीतच अनिल बोंडे आणि नवनीत राणांमध्ये खडाजंगी, जुन्या जखमा पुन्हा ताज्या

दिव्य वतन /वृत्तसेवा

अमरावतीत महायुतीमध्ये 'बिघाडी' झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काही प्रभागांत नवनीत राणा भाजपच्या प्रचारासाठी मैदानात आहेत, तर काही ठिकाणी भाजप उमेदवाराच्या विरोधातच राणा दाम्पत्याने धुराळा उडवला आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित भाजपच्या प्रचार सभेत खासदार अनिल बोंडे आणि नवनीत राणा यांच्यात जाहीर व्यासपीठावरच जुंपली. 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेचा संदर्भ देत सुरू झालेली ही चर्चा थेट एकमेकांच्या निष्ठेपर्यंत जाऊन पोहोचली.

अमरावती महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना राजकारणातील वेगवेगळे रंग देखील अनुभवायला मिळत आहेत. नवनीत राणा या एकीकडे भाजप उमेदवारांचा प्रचार करत आहेत, तर दुसरीकडे आपल्या पतीच्या पक्षाच्या उमेदवारांसाठी देखील सभा घेत आहेत. यावरून भाजप खासदार अनिल बोंडे यांनी भाजपच्या सभेत नवनीत राणा यांना टोला लगावला. यानंतर नवनीत राणा यांनी देखील अनिल बोंडे यांच्यावर पलटवार केला.

सभेत बोलताना खासदार अनिल बोंडे यांनी सुरुवातीला काँग्रेस आणि 'एमआयएम'वर निशाणा साधला. "महापौर हिंदूच झाला पाहिजे," असे ठणकावून सांगताना त्यांनी आपला मोर्चा नवनीत राणांकडे वळवला. बोंडे म्हणाले, "कोण काय बोलतंय याकडे लक्ष देऊ नका, केवळ कमळासाठी मते मागा. एकदा भगवा खांद्यावर घेतला की जुनं विसरून जा. माझा सखा भाऊ जरी 'युवा स्वाभिमान' (YSP), राष्ट्रवादी किंवा काँग्रेसकडून उभा असता, तरी मी माझ्या भगव्याशी (भाजपशी) प्रामाणिक राहिलो असतो," असा थेट चिमटा त्यांनी नवनीत राणा यांना काढला.

खासदार बोंडे यांनी काढलेल्या चिमट्यानंतर नवनीत राणा यांनीही आक्रमक



पवित्रा घेत भरसभेतच उट्टे काढले. बोंडेंना प्रत्युत्तर देताना त्या म्हणाल्या, "बोंडे भाऊ, मीही मोर्शी फिरून आली आहे आणि तिथे माझी सभाही झाली आहे. मला कोणालाही सांगण्याची गरज नाही. जो भगव्याशी आणि भाजपशी बेईमानी करेल, त्यांच्या पाठीशी नवनीत राणा कधीच उभी राहणार नाही."

# उद्धव ठाकरे मनसेसोबत युतीतून काय नवीन शिकायला मिळालं ?

दिव्य वतन /वृत्तसेवा

संजय व्हनमाने, मुंबई : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसेने केलेल्या युतीवर होणाऱ्या टीकेचा शिवसेना (उबाठा) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी समाचार घेतला. अंबरनाथ आणि अकोटमधील युतीवरून त्यांनी भाजपला लक्ष्य केले. 'ठाकरे बंधू सत्तेसाठी एकत्र आले असे म्हणणारे अकोटमध्ये एमआयएमसोबत, अंबरनाथमध्ये काँग्रेससोबत कशाला एकत्र आले,' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'ला विशेष मुलाखत दिली. यावेळी महापालिका निवडणूक, महापालिकेतील प्रशासक कारभार, युती, आघाड्या याविषयी त्यांनी भाष्य केले. 'भाजपला धडा शिकविण्यासाठी आम्ही काँग्रेससोबत आघाडी केली होती, मात्र मुंबई आणि मराठी माणसाच्या हितासाठी आम्ही मनसेसोबत युती केली,' असे त्यांनी अधोरेखित केले.

'शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्ह या विषयी सुरू असलेल्या खटल्याचे आम्ही केवळ दिवस मोजत नाही, तर दिवस लांबवणाऱ्या न्यायाधीशांची संख्याही मोजत आहोत,' असे ते म्हणाले. याशिवाय मुंबई महापालिकेतील प्रशासक पद्धतीवर आक्षेप नोंदविताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही त्यांनी टीका केली.

- दरवेळची निवडणूक ही वेगळीच असते. पण या वेळेची निवडणूक ही अत्यंत दुष्टपणाने आणि कपटीपणाने मुंबई किंवा मराठी माणसाचे अस्तित्व संपविण्याच्या दृष्टीने भाजप लढवत आहे.

मुंबई महापालिकेत मागच्या काळात भाजप तुमच्या सोबत सत्तेत होती, मात्र आता तेच तुमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करीत आहेत?

-आताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच २०१७ साली पण मुख्यमंत्री होते. पारदर्शकता



आणा असे ते त्यावेळी ते सांगत होते. त्यामुळे आता जेवढी पारदर्शकता आहे तेवढी ती कधीच नव्हती. एवढ्या पारदर्शकपणे, उघडपणे कधीच पैसे खाल्ले गेले नव्हते. गेल्या चार वर्षांमध्ये यांनी जवळपास तीन लाख कोटींचा घोटाळा केलेला आहे. साधारणतः २०१२ ला मुंबई महापालिकेचा जो अर्थसंकल्प होता तो तुटीचा अर्थात ६४० कोटी रुपयांचा होता. त्यानंतर २०२२ पर्यंत तो ९२ हजार कोटींच्या मुदत ठेवी वाढवण्यापर्यंत आम्ही नेला. त्याच्यानंतर २०२२ ते २०२६ पर्यंत ९२ हजार कोटीच्या ठेवी यांनी ८० हजार कोटी पर्यंत तोडल्या आणि त्याच्या समोर साधारणतः तीन लाख कोटींच्या वर्क ऑर्डर्स अर्थात कार्यारंभ आदेश देत एकप्रकारे मुंबईकरांवर देणं करून ठेवले. आता त्यातही यांनी तीन लाख कोटींच्या कामांसाठी ॲडव्हान्स मोबिलायझेशन अर्थात आगाऊ रक्कम द्यायला लावली. त्यातून या लोकांनी किक बॅक अर्थात मलिदा घेतला. अशाप्रकारे यांनी तीन लाख कोटींचा घोटाळा केला. हे घोटाळा करणार आणि आम्हाला वर बोलणार यालाच चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात. यांच्यापर्यंत कोणी येऊच नये, त्यांना कोणी प्रश्न विचारूच नयेत, अशीच यांची निती आहे.

-बरं, मग काय अडचण काय? आलो सत्तेसाठी. आता अकोटमध्ये एमआयएम बरोबर भाजप एकत्र आला आहे ते काय विटी दांडू खेळायला? अंबरनाथमध्ये पण भाजपने जी काही युती केली काँग्रेस सोबत, ती काय लगोरी खेळायला? अजित पवार ज्यांनी ७० हजार कोटींचा घोटाळा केला असे तुम्हीच सांगत होतात त्यांना सोबत काय आट्यापाट्या खेळायला घेतले आहे काय? आम्ही मुंबईकरांच्या नशिबी निरोगी आयुष्य जगायला मिळावं याच्यासाठी एकत्र आलो आहोत. मुंबईचं, महाराष्ट्राचं, मराठी पण टिकविण्यासाठी एकत्र आलो आहोत.

### सिंह-वाघांचा वारसा, लांडग्यांकडे लक्ष नाही!

मुंबई - महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण अधिकच तापत चालले असून, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील वाकयुद्ध आता वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांच्या पातळीवर पोहोचले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार सातत्याने भाजपवर, विशेषतः पुण्यातील भाजप नेत्यांवर जोरदार टीका करताना दिसत आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजप नेतेही आक्रमक भूमिका घेत असून, या संघर्षामुळे निवडणुकीच्या रणधुमाळीत वातावरण अधिकच तणावपूर्ण बनले आहे.पिंपरीतील भाजप आमदार महेश लांडगे यांनी केलेली टीका या वादाला नवी धार देणारी ठरली. अजित पवार हे महाराष्ट्राचे आणि पुण्याचे 'आका' असल्याचा आरोप करत, त्यांनी अजित पवारांवर थेट भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केल्याचा आरोप केला.